


रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३३
www.ramprahar.com

# राम प्रहर

सोमवार, १९ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

रेवदंडा बंदरात साकारणार नवी रो-पॅक्स जेट्टी/२
जेएनपीए उभारणार प्रदूषण कमी करणारा प्रकल्प/६
गावातील मुलींनी कुस्तीत पुढे यावे -विनेश फोगट/८

# महिलांच्या जीवनात परिवर्तन होतंय

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन ■ लाडक्या बहिणींचा देवाभाऊ कार्यक्रम उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**

विकसित भारत घडवायचा असेल भगिनींना मुख्य धारेत आणल्याशिवाय होऊ शकत नाही. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाहीत, स्वत:च्या पायावर उभे राहू शकत नाही तोपर्यंत देश विकसित होणार नाही. त्यामुळे मोदी सरकारने महिला केंद्रित धोरण पुढे आणले आहे. महिलांच्या जीवनात परिवर्तन होत आहे. आता पुढच्या काळात २०२७नंतर जितक्या निवडणुका होतील तिथे महिला प्रतिनिधित्व मिळणार आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत १०० महिला प्रतिनिधी पहायला मिळतील, तर लोकसभेत त्याहून दुप्पट महिला प्रतिनिधित्व दिसेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १८) येथे केले. मुंबई भाजप आयोजित लाडक्या बहिणींचा देवाभाऊ या कार्यक्रमात ते बोलत होते.



या वेळी अनेक महिलांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना राखी बांधली. त्यात चिमुकलीही गर्दीतून वाट काढत स्टेजजवळ पोहचली तेव्हा सुरक्षा रक्षकांना सांगून फडणवीसांनी या चिमुकलीला व्यासपीठावर बोलावून घेतले. या वेळी फडणवीस म्हणाले की, आज या सभागृहात जेवढी गर्दी आहे तितकीच सभागृहाबाहेर आहे. जर इतक्या मोठ्या संख्येने सभागृहात महिला जमल्या तर चेंगराचेंगरी होईल, असे पोलीस म्हणाले. त्यामुळे या महिलांनी निराश होऊ नका, तुम्हाला या सभागृहात जागा मिळाली नसली तरी माझ्या हृदयात बहिणींसाठी जागा आहे.

काही नादान बोलतात १५०० रुपयांत तुम्ही विकत घेऊ शकत नाही. अहो, बहिणीचे प्रेम कुणी खरेदी करू शकत नाही. १५ कोटी देऊनही हे प्रेम खरेदी करू शकत नाही. ज्या प्रेमाने आपल्याला ऊर्जा मिळतेय. त्या बहिणींना ओवाळणी म्हणून देण्याचा १५०० रुपये देण्याचा प्रयत्न आहे. दरवर्षी ही ओवाळणी आम्ही देऊ. राखी हे कवच आहे. हे कवच घेऊन पुन्हा मैदानात उतरणार आहे, असा निर्धार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करत विरोधकांवर निशाणा साधला.

# जासई येथे १ सप्टेंबरला भव्य आगरी समाज मेळावा

## नियोजन सभा उत्साहात



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अखिल आगरी समाज परिषदेतर्फे १ सप्टेंबर रोजी उरण तालुक्यातील जासई येथील दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील सभागृहात भव्य आगरी समाज मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी नवी मुंबईच्या कोपरखैरणे येथील शेतकरी समाज हॉलमध्ये शनिवारी (दि. १७) नियोजन सभा झाली. अखिल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार संजीव नाईक, उद्योगपती जे.एम. म्हात्रे, कार्याध्यक्ष जे.डी. तांडेल यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सभा झाली.

आगरी समाजाच्या सध्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय परिस्थितीचा विचार करून सामूहिक संघटनेच्या बळावर काही ठोस कार्यवाही करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी अखिल आगरी समाज परिषदेतर्फे समाजातील लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक आणि समाज बांधव, भगिनींचा भव्य मेळावा १ सप्टेंबरला सकाळी १० वाजता जासई येथील लोकनेते दि. बा. पाटील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

आगरी समाज काल, आज आणि उद्या या आशयाखाली होणाऱ्या या मेळाव्यात नवनिर्वाचित खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा आणि खासदार संजय दिना पाटील यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. या वेळी गावठाण विस्तार सिमांकन वाढवणे, क्लस्टर योजना, स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणासाठी भुमिपूत्रांच्या जमिनी संपादन केल्यामुळे बेरोजगारीत झालेली वाढ, जातवार जनगणना झालीच पाहिजे, ओबीसी आरक्षणासाठी करावा लागणारा संघर्ष, नैना प्रकल्प, रेती व्यवसाय, विमानतळ नामकरण, नोकऱ्या, पाणथळ जमीन, उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील कोपरखैरण्यात नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व संजीव नाईक यांनी मेळाव्याबाबत मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले तसेच आपल्या आगरी समाजाने पक्षीय मतभेद बाजूला सारून संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. **(पान २ वर..)**

# पनवेलमध्ये कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप मुंबई आयोजित लाडक्या बहिणींचा देवाभाऊ कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमाचे दूरदृष्य प्रणालीद्वारे थेट प्रक्षेपण भाजप उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या वतीने पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालयात लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. या कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



(अधिक छायाचित्र पान ८ वर..)

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने महिलांच्या भावना जाणून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतून विविध ठिकाणी संवाद साधला. या कार्यक्रमास पनवेल येथे प्रमुख मान्यवरांसह भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, महिला मोर्चा जिल्हा पदाधिकारी संध्या शारबिद्रे, मंजुषा कुद्रीमोती, वृषाली वाघमारे, पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, महायुती सरकारच्या माध्यमातून विविध जनकल्याणकारी योजना राज्यातील नागरिकांसाठी राबविण्यात येत आहेत. या योजना अविरतपणे सुरू राहतील. सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कार्यक्षम आहेत. नाहीतर त्यांच्याआधीचे मुख्यमंत्री घरून, फेसबुकवरून कारभार पहायचे. मुख्यमंत्री शिंदेंसोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही दमदारपणे काम करीत आहेत. त्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले होते, मात्र महाविकास आघाडीच्या सरकारने न्यायालयात वेळवर वकील दिला नाही. त्यामुळे ते आरक्षण गेले. **(पान २ वर..)**

## निवडक

### ‘आषाढीत’ही मिळणार दोन तासांत दर्शन; आराखडा मंजूर

**पंढरपूर** : तिरुपतीच्या धर्तीवर विठ्ठल-रुक्मिणीच्या मंदिरात टोकन दर्शनाची घोषणा केल्यानंतर शनिवारी यासाठी दर्शन मंडप आणि स्कायवॉकला राज्य सरकारच्या उच्चाधिकार समितीने मान्यता दिली. यामुळे आता पंढरपुरातील लांबच लांब दर्शन रांग इतिहासजमा होणार असून आषाढी एकादशीलाही भाविकांना केवळ दोन तासांत दर्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी ११० कोटी रुपयांचा आराखडा मंजूर झाला असून पुढील महिनाभरात या कामाला सुरुवात होईल.

### राज्यात सर्वदूर जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज

**मुंबई** : राज्यातील शेतकरीराजासाठी आनंदाची बातमी आहे. राज्यात २४ ऑगस्टपर्यंत सात दिवसांत जोरदार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, शनिवार, रविवारी काही भागांत पावसाने हजेरी लावल्याचे दिसून आले.

# जासई येथील मृतदेहाचे गूढ उकलले

## पत्नीसोबतच्या प्रेमसंबंधातून मित्राची हत्या

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जासई येथे प्लास्टिकच्या गोणीत एक मृतदेह आढळला होता. या व्यक्तीची पत्नीशी असलेल्या प्रेमसंबंधातून पतीने डोक्यात दगड घालून हत्या केल्याचे उघड झाले आहे. आरोपी आणि मृत व्यक्ती मित्र होते, मात्र मित्राचे पत्नीसोबत प्रेमसंबंध जुळल्याने संतप्त झालेल्या पतीने मित्राला संपवले आहे.

आरोपी बालगंधर्व रामचंद्र गोडस (४२) आणि दत्तात्रेय महादेव बुटूकडे (४०) हे सातार्‍यातील विरली गावचे रहिवासी आहेत. दोघेही चालक म्हणून एकाच कंपनीत काम करीत असल्याने त्यांच्यात मैत्री होती. उरण तालुक्यातील जासई गावात बालगंधर्व गोडस पत्नीसह, तर दत्तात्रेय बुटूकडेही अन्य भाड्याच्या घरात राहायला होता. बालगंधर्वशी मैत्री असल्याने दत्तात्रेयचे त्याच्या घरी येणे जाणे होते. यादरम्यान बालगंधर्वच्या पत्नीशी दत्तात्रेयचे प्रेमसंबंध जुळले. काही दिवसांनंतर पत्नी आणि मित्रामध्ये सुरू असलेल्या प्रेमप्रकरणाची कुणकुण पतीला लागली. यामुळे बऱ्याच दिवसांपासून मनातून बैचेन व संतापलेला बालगंधर्व दत्तात्रेयचा काटा काढण्यासाठी संधी शोधत होता. त्यानुसार बालगंधर्वने १६ ऑगस्ट रोजी दत्तात्रेयला घरी जेवायला बोलावले. रात्री जेवण झाल्यानंतर बालगंधर्वने दत्तात्रेयच्या डोक्यावर दगड टाकून त्याची हत्या केली.




### आरोपी दाम्पत्य ताब्यात

विशेष म्हणजे हत्येनंतर बालगंधर्वने पत्नीच्या मदतीने दत्तात्रेयचा मृतदेह प्लास्टिकच्या गोणीत भरून नजीकच्याच शाळेतील शौचालयाच्या बाजूला असलेल्या गवतात टाकून दिला. शनिवारी सकाळी प्लास्टिकच्या गोणीत काहीतरी संशयास्पद असल्याची बाब नागरिकांच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी पोलिसांना खबर दिली. उरण पोलिसांनी घटनास्थळी येत प्लास्टिकची गोणी उघडून पाहिली असता त्यामध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळला. पोलिसांना लागलीच तपासाची चक्रे फिरवत आरोपी बालगंधर्व व त्याची पत्नी चांगुणा यांना ताब्यात घेतले आहे.

# कोलकाता अत्याचार प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाकडून दखल


## [ २० ऑगस्टला सुनावणी ]

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाता येथील आर.जी.कार वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि त्यानंतर तिच्या निर्घृण हत्येच्या घटनेने देशभर खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर सर्वत्र संताप व्यक्त केला जातो आहे. या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. यासाठी देशभरात निर्देशनेही केली जात आहेत. दरम्यान, आता सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली असून लवकरच यावर सुनावणी होणार आहे.

एएनआय वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून या प्रकरणाची दखल घेतली आहे. यावर २० ऑगस्ट रोजी सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला व न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

# महाबळेश्वरमधील तिघांचा महाडच्या नदीत बुडून मृत्यू



**महाड : प्रतिनिधी**

महाबळेश्वरमधील तीन जणांचा महाड तालुक्यातील सव येथे सावित्री नदीत बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १८) दुपारी घडली. दिलावर शहाबुद्दीन नालबंद (वय २८), मुनवर शहाबुद्दीन नालबंद (वय ३८) आणि जाहिद जाकिर पटेल (वय २५, सर्व रा, महाबळेश्वर, जि. सातारा) अशी मृतांची नावे आहेत. यामध्ये दोन सख्या भावांचा समावेश आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या सव गावात गरम पाण्याचे झरे आणि एक दर्गा आहे. महाबळेश्वरमधील तीन जण तेथे पर्यटन केल्यानंतर शेजारी असलेल्या नदीच्या जेट्टीवर गेले. या ठिकाणी पाण्यात हातपाय धूत असताना एकाचा पाय घसरला आणि तो पाण्यात बुडू लागला. त्याला वाचवण्यासाठी त्याचा सख्खा भाऊ खाली उतरला, मात्र तोदेखील बुडू लागल्याने सोबत असलेला मित्र पाण्यात गेला आणि एकमेकांना वाचवण्याच्या धावपळीत तिघेही बुडाले व त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेत मुनवर शहाबुद्दीन नालबंद याची पत्नी व मुले वाचली आहेत. वृत्त समजताच महाड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. रेस्क्यू पथकालाही पाचारण करण्यात आले. या पथकाला तिन्ही मृतदेह नदीपात्रात सापडले.

## सन आयलाय गो नारली पुनवचा...

# कोळी बांधवांच्या आनंदाला उधाण



**पाली : प्रतिनिधी**

कोळी बांधवांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेला नारळी पौर्णिमेचा सण सोमवारी (दि. १९) साजरा होणार आहे. यासाठी कोळी बंधू-भगिनी सज्ज झाले असून कोळीवाड्यांमध्ये आनंद व उत्साह पहावयास मिळत आहे.

रायगड जिल्ह्याला २४० किमी लांबीचा विस्तृत समुद्र किनारा लाभला आहे. येथील कोळी लोक या दर्याचे खरे राजे आहेत. त्यांच्यासाठी नारळी पौर्णिमेचा सण खूप महत्त्वाचा असून श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला तो साजरा केला जातो. या दिवशी गोडधोड करून, पारंपरिक वेशभूषेत नाचत गात कोळी बांधव मोठ्या उत्साहात दर्याला नारळ अर्पण करून हा सण साजरा करतात.

जून महिन्यापासून दोन महिने म्हणजेच ३१ जुलैपर्यंत समुद्रातील मासेमारी बंद असते. १ ऑगस्टपासून नवा मासेमारी हंगाम सुरू असला तरी नारळी पौर्णिमेनंतर मासेमारीला खऱ्या अर्थाने सुरुवात होते. यानिमित्ताने मच्छीमारांनी पताका आणि झेंडे लावून आपल्या बोटी सजवल्या आहेत. पौर्णिमेला समुद्र देवतेची पूजा केली जाते. नारळाला पवित्र मानून तो सागराला अर्पण केला जातो. नारळ अर्पण केल्याने समुद्र शांत राहील आणि मच्छीमार सुरक्षित राहतील, अशी श्रद्धा आहे. त्यानंतर खोल समुद्रात मोठ्या प्रमाणात मासेमारीला सुरुवात होते.

नारळी पौर्णिमेला मच्छीमार लोक समुद्र किनाऱ्यावर एकत्र येऊन सामुदायिकपणे पूजा करतात. या वेळी पारंपरिक गीते गायली जातात. समुद्राच्या कृपेने भरपूर मासे मिळतील, अशी कामना केली जाते. नारळ फोडाफोडीचा खेळदेखील रंगतो, जो पाहण्यासाठी गर्दी होते.

# सांगलीत पुन्हा ठाकरे विरुद्ध विशाल पाटील

**सांगली : प्रतिनिधी**

सांगलीत पुन्हा एकदा ठाकरे विरुद्ध खासदार विशाल पाटील असा संघर्ष पहायला मिळणार आहे. पाटील यांनी खानापूर मतदारसंघात शिवसेनेचे दिवंगत आमदार व इच्छूक उमेदवार सुहास बाबर यांच्या पाठिशी असल्याचे जाहीर केले आहे.

लोकसभा निवडणुकीत सांगलीच्या जागेवरून काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्यात टोकाचा वाद झाला होता. ठाकरेंनी हट्टाने सांगलीची जागा काँग्रेसकडून आपल्याकडे घेतली आणि त्या ठिकाणी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिली, मात्र ठाकरेंच्या उमेदवाराविरोधात काँग्रेस नेते विशाल पाटील यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणुकीला सामोरे गेले. या निवडणुकीत विशाल पाटलांनी दणदणीत विजय मिळवला.

# राख्यांमध्ये यंदा विविध नवे ट्रेण्ड

## ■ खरेदीसाठी बाजारपेठेत महिलांची गर्दी

**पनवेल : वार्ताहर**

बहीण भावाच्या अतूट नात्याचे प्रतिक असणारा सण म्हणजे रक्षाबंधन. राखी पोर्णिमा सोमवारी (दि. १९) असून यानिमित्ताने बाजारपेठेत यंदा राख्यांचे विविध नवे ट्रेण्ड लक्ष वेधून घेत आहे. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला भावाला राखी खरेदी करण्यासाठी महिलावर्गाची रविवारी बाजारात गर्दी उसळलेली दिसून आली.

नेहमीच्या गंडा राखीसह रंगीबेरंगी राख्या उपलब्ध आहेत. कलकत्ता राखी, चंदन राखी, ओम व स्वस्तिक चिन्ह असलेल्या राख्या, डायमंड राखी, मोती राखी, कुंदन राखी, श्री राखी, मोर राखी, चांदी राखी, कलर स्टोन राखी, पारंपरिक पद्धतीच्या गोंडा राखी, दोरी राखी, मारवाडी राखी, कुंदन, मण्याची राखी, कार्टुन राखी अशा विविध प्रकारच्या राख्या बाजारात आहेत. १० रुपयांपासून ते १५० रुपयांपर्यंत या राख्या असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.



लाल, पिवळा, नारंगी अशा भडक रंगाच्या राख्यांना अधिक मागणी आहे. आपल्या लाडक्या भावासाठी बहिणीही विविध व्हरायटीच्या राख्या विकत घेताना दिसत आहेत. चिमुकल्यांसाठी लायटिंग राख्या, छोटा भीम, डोरेमॉन, मोटू पतलू, श्री गणेशा, श्रीकृष्ण अशा राख्या बाजारात विक्रीस आल्या आहेत.

दरम्यान, राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये याप्रमाणे जुलै व ऑगस्ट अशा दोन महिन्यांची एकूण तीन हजार इतकी रक्कम त्यांच्या बँक खात्यात रक्षाबंधनाआधीच जमा झाली. ही महिलावर्गासाठी विशेष ओवळणी असून त्यामुळे महिलांचा आनंद द्विगुणित झाला आहे.

# रेवदंडा बंदरात साकारणार रो-पॅक्स जेट्टी

## ◆ मुंबईतून पावणे दोन तासांत गाठता येणार रेवदंडा
## ◆ ब्रेकवॉटर सिस्टीमसह १७५ कोटींचा प्रस्ताव

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवर रेवदंडा हे प्रमुख ऐतिहासिक बंदर आहे. या बंदरात नवी रो-पॅक्स जेट्टी बांधण्यात येत असून मध्य रायगड मुंबईला सागरी मार्गाने जोडला जाणार आहे. मुंबईतून रेवदंडा येथे पोहचण्यासाठी रस्तेमार्गाने १०९ किमीचे अंतर कापण्यासाठी लागणारा साडेतीन तासाचा वेळ ५० टक्क्यांनी कमी होणार आहे. त्याचबरोबर खड्डे, वाहतूक कोंडी यापासूनही मुक्तता मिळणार आहे.

बाराही महिने सुरू राहणाऱ्या या रो-पॅक्स सुविधेमुळे मुंबईतून स्वतःचे वाहन घेऊन रेवदंडा येथे पोहचणे शक्य होणार असून या जेट्टीमुळे मुरूड, रोहा, श्रीवर्धन, तळा येथील पर्यटन वाढीला चालना मिळेल. मेरीटाईम बोर्डाच्या तांत्रिक टीमने रेवदंडा बंदराची मान्सूनमध्ये पाहणी केली. मुरूडकडे जाताना साळाव पुलाच्या उजव्या बाजूला या जेट्टीसाठी जागा निश्चित करण्यात आली आहे.

या बंदरात उसळणाऱ्या लाटांचा आभ्यास करून ५१० मीटर लांबीचा ब्रेक वॉटर बंधारा बांधण्याचा आराखडा सूचवण्यात आला आहे. यासह बाराही महिने बोटी बंदरात उभ्या करता करता येतील अशी जेट्टी, जेट्टीपर्यंत पोहच रस्ता, जेट्टीच्या बाजूला पार्किंगसाठी जागा ठेवली जाणार आहे. मेरीटाईम बोर्डाने या सर्वांचा एक आराखडा तयार केला असून, त्यास तांत्रिक विभागानेही हिरवा कंदील दाखवला आहे. १७५ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चाचा आराखडा राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठवण्यात आला आहे. येत्या महिनाभरात यास मंजुरी मिळाल्यानंतर आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी त्याचे भूमिपूजन करण्याचा करण्याचा प्रयत्न असणार आहे.

सागरमाला प्रकल्पातंर्गत रायगड जिल्ह्याच्या समुद्रकिनारी मेरीटाईम बोर्डाकडून बारमाही जलवाहतुकीसाठी काही ठिकाणे निवडण्यात आली आहेत. त्यात रेवदंडा बंदराचाही समावेश करण्यात आला आहे. येथे बारमाही जलवाहतूक सुरू झाल्यास मध्य रायगडमधील अनेक पर्यटनस्थळांना संजीवनी मिळणार आहे.

### रो-पॅक्स सेवेची वैशिष्ट्ये

१) १७५ कोटींचा अंदाजित आराखडा
२) एक तास ४५ मिनिटांत पोहचणार रेवदंडा बंदरात
३) वाहनांसह पोहचता येणार
४) बारमाही जलवाहतुकीने पर्यटनाला चालना
५) मच्छीमारांनाही मासे उतरवण्यासाठी होणार फायदा

**१७५ कोटीचा प्रस्ताव राज्यशासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आलेला आहे. मांडवा जेट्टीपेक्षा आधुनिक तंत्रज्ञान या जेट्टीसाठी वापरला जाणार आहे. ब्रेकवॉटर बंधाऱ्यात गाळ साचू नये यासाठीही विशेष काळजी घेतली जाणार आहे. भाऊचा धक्का येथून सुटलेली रो-रो प्रवाशांसह त्यांची वाहने घेऊन एक तास ४५ मिनिटांत रेवदंडा बंदरात पोहचेल.**
**-सुधीर देवरे, कार्यकारी अभियंता, मेरीटाईम बोर्ड**

**या बंदरामुळे येथील पर्यटनाला चालना मिळणार आहे. मुंबईतील पर्यटक या बंदरात थेट आपली वाहने घेऊन येऊ शकतात. मागील अनेक वर्षापासून हा प्रस्ताव रखडला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून रेवदंडा जेट्टीसह वरसोली, आक्षी, एकदरा जेट्टीचेही प्रस्ताव तयार केले जात आहेत.**
**-आमदार महेंद्र दळवी, अलिबाग मुरूड विधानसभा**

# विरोधकांना कंदी पेढे पाठवा

## सातार्‍यात मुख्यमंत्री शिंदे यांचे टीकास्त्र



**सातारा : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा रविवारी (दि.१८) सातार्‍यामध्ये पार पडला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. या वेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, तुम्ही टेन्शन घेऊ नका सावत्र भावांना टेन्शन द्या. या योजनेच्या यशाने वेडे झालेल्या विरोधकांना आपल्या सातार्‍याचे प्रसिद्ध कंदी पेढे खायला पाठवा, असे म्हणत जोरदार फटकेबाजी केली.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, सर्व ठिकाणी महिलांचा महासागर पहायला मिळाला. सगळ्यात जास्त भगिनी या कार्यक्रमात उपस्थित आहेत. मी या सातार्‍याचा भूमीपुत्र आहे आणि इथे कार्यक्रम होतोय हे माझ्यासाठी भाग्याचे आहे. आपल्या समोर नतमस्तक होतो. मी भाग्यवान आहे मला आपल्यासारख्या बहिणी मिळाल्या. हा कार्यक्रम महाराष्ट्रात सुपर डूपर हीट झाला आहे. लाडक्या बहिणींसाठी पूर्ण आर्थिक वर्षात ३५ हजार कोटींची तरतूद देण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

विरोधक दोन चार महिन्यांतून सरकार पडेल म्हणायचे, पण असे झाले नाही. मी सामान्य कुटुंबातून आलेला मुख्यमंत्री आहे, सोन्याचा चमचा घेऊन आलेला नाही. आम्ही आता १५०० रुपयांनी योजना सुरू केली पुढे सरकारची ताकद वाढली की, या दीड हजारांचे तीन हजार किंवा त्यापेक्षा जास्त होईल. आम्हाला फक्त ३००० घेऊन थांबायचे नाही, आम्हाला लखपती झालेली बहीण बघायची आहे, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

ही ओवाळणी दर महिन्याला भावांकडून मिळणार आहे. तुम्ही टेन्शन घेऊ नका सावत्र भावांना टेन्शन द्या. आपल्या बहिणींबद्दल उद्‍गार काढताना विरोधकांना थोडी लाज वाटली पाहिजे. खात्यात पैसे आल्यावर विरोधकांचे तोंड पांढरे फटक झाले. आपली बहीण लाडकी आणि विरोधकांच्या छातीत धडकी भरली. १७ ऑगस्ट हा दिवस मुख्यमंत्री लाडकी बहीण दिन म्हणून आपण साजरा करूया. या योजनेच्या यशाने वेडे झालेल्या विरोधकांना आपल्या सातार्‍याचे प्रसिद्ध कंदी पेढे खायला पाठवा, असा टोलाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला.

# रोह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत संवाद कार्यक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा रोहाकडून शहरातील ज्येष्ठ नागरिक हॉल येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या संदर्भात संवाद सत्र आयोजित करण्यात आले होते.

कार्यकर्त्यांनी अनेक महिलांचे फॉर्म ऑनलाईन नोंदणी करून घेतले होते. त्या महिलांना या वेळी आमंत्रण दिले होते. अनेकांच्या खात्यात दोन महिन्यांचे मिळून तीन हजार रुपये जमा झाल्यामुळे महिलांच्या चेहर्‍यावर आनंद दिसत होता. महायुती सरकारच्या माध्यमातून ही योजना महिलांना आधार देणारी योजना ठरत आहे.

भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर यांच्या नेतृत्वात गेले एक महिना नोंदणी चालू होती. त्या नोंदणी केलेल्या महिलांचा एकत्रित संवाद कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी पंचायत समितीमधील शिंदे मॅडम उपस्थित होते, तसेच युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेशजी थोरे यांनी महिलांना योजनेचे महत्त्व तसेच सरकारचे धोरण उपस्थित महिलांना मांडले.

कार्यक्रमास रोहा शहराध्यक्ष यज्ञेश भांड, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस जयश्री भांड, हाजी कोठारी युवा मोर्चा चिटणीस नरेश कोकरे यांनी मार्गदर्शन केले. रोहा तालुका महिला मोर्चा सरचिटणीस रिया कासार यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ नेते माजी उपनगराध्यक्ष शेलार मामा, महिला नेते ज्योती सनलकुमार, दक्षिण रायगड युवा मोर्चा उपाध्यक्ष परेश सांगळे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अनिल घरजाळे यांची उपस्थिती होती. नोंदणीसाठी रात्रदिवस मेहनत घेणारे दक्षिण रायगड युवा वॉरिअर्स संयोजक वैभव कुळकर्णी, भरत ठाकरे, रसिका जाधव, करण सोनुने, वैभवी भगत, स्वरूप नाकती, रिया कासार यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी योजनेतील काही महिलांना पैसे जमा झाले नाहीत त्यांचे प्रश्नोत्तरांचे सत्र पार पडले. या योजनेमुळे सर्वसामान्य माता-भगिनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार असून त्यांना आर्थिक पाठबळ मिळणार आहे. याचा नक्कीच चांगला परिणाम सामाजिक जडणघडणीवर होणार आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी चालना मिळणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तसेच रोहा भाजप टीमचे उपस्थित महिलांनी आभार मानले.



# भाजपतर्फे नवी मुंबईत आरोग्य शिबिर उत्साहात



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई कोपरी गावातील नागरीकासाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन डी.वाय. पाटील रुग्णालय व भाजप यांच्या संयुक्त विद्यमाने भाजप महाराष्ट्र प्रदेश महासचिव प्रिती नायर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी २००हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. आजार होण्याची वाट न पाहता आरोग्य तपासणी वेळेत झाली तर अनेक आजारावर मात करू शकतो. त्याच अनुषंगाने शिबिराचे आयोजन केल्याचे प्रीती नायर यांनी सांगितले. या वेळी रक्तदाब तपासणी, लहान मुलांचे आजार, महिलांचे आजार, हाडांचे, नाक, घसा आदी तपासणी केली.

या वेळी भाजप संयुक्त टार्सपोर्ट संघटनेचे प्रदेश अध्यक्ष निरगुन कवळे, माजी नगरसेवक अमृत मेढकर, माजी नगरसेविका सुभांगी पाटील, महादेव वाघमारे आदी उपस्थित होते.

# क्रीडा क्षेत्रात कणे गावाचे नाव चमकायला हवे -वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

मी राजकीय हेतूने कधीच काम केले नाही. कणे गावातील माझ्या जीवाभावाच्या माणसांसाठी व्यायामशाळेचे काम माझ्या हातून होणे होते याचा मला सार्थ अभिमान आहे. कणे आणि कबड्डी याचे नाते अतूट आहे. क्रीडा क्षेत्रात कणे गावाचे नाव देशात चमकायला हवे, अशा भावना रायगड जिल्हा भाजप उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी व्यक्त केल्या.

कणे गावातील व्यायामशाळेच्या भूमिपूजनप्रसंगी रविवारी (दि.१८) ते बोलत होते. ही व्यायामशाळा ते स्वखर्चाने बांधून देणार आहेत.

तालुक्यातील कणे हे गाव कबड्डीची पंढरी म्हणून ओळखले जाते. कणे गावाने गोपीनाथ पाटील, देविदास पाटील, मारुती म्हात्रे, चंद्रकांत भोईर हे राष्ट्रीय खेळाडू दिले आहेत. गावातील झुंझार व्यायामशाळा गेली ३० वर्षांपासून मोडकळीस आल्याने तरुणांच्या कमिटीने वैकुंठ पाटील यांच्याकडे मागणी केली. त्यांनी तत्काळ स्वखर्चाने ही व्यायामशाळा बांधून देण्याचे ग्रामस्थांना आश्वस्त केले. त्यानुसार रविवारी प्रत्यक्ष कामाला सुरुवातसुद्धा केली. या कामाच्या भूमिपूजन कार्यक्रमानंतर व्याघ्रेश्वर मंदिरात झुंझार कबड्डी संघाचे अध्यक्ष बाळाराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ग्रामस्थांनी एकमताने वैकुंठ पाटील यांच्या पाठीशी राहण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमाला उपसरपंच जयवंत बांधनकर, सदस्य देविदास पाटील, माजी सरपंच कुणाल पाटील, माजी उपसरपंच भाजप महिला पदाधिकारी प्रचीता पाटील, सामाजिक कार्यकर्ते नंदू पाटील, काँग्रेस नेते आर. जे. म्हात्रे, शांताराम भोईर, संभाजी पाटील, शामकांत पाटील, माजी सदस्य धीरज पाटील, गाव अध्यक्ष विजय पाटील, प्रभाकर पाटील, राहुल पाटील, जयंता म्हात्रे, निलेश म्हात्रे, संतोष म्हात्रे, विनोद म्हात्रे, भगवान पाटील, कल्पेश पाटील हरिदास पाटील, नितेश म्हात्रे, नवनाथ म्हात्रे, केशव काळे आदी उपस्थित होते.



# दलित संघटनांची बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत आंबेडकरवादी भारत मिशनतर्फे आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी दलित संघटनांची बैठक शनिवारी (दि. १७) प्रेस क्लबमध्ये आयोजित करण्यात आली होती. यात बुधवारी (दि.२१) दुपारी १ वाजता आझाद मैदानात दलित एकता धरणे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही माहिती बैठकीचे निमंत्रक दलित पँथरचे नेते सुरेश केदारे आणि ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांनी एका पत्रकाद्वारे दिली.

या बैठकीला रिपाइं (सेक्युलर)चे अध्यक्ष श्याम गायकवाड, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे अध्यक्ष ॲड. डॉ. सुरेश माने, ज्येष्ठ रिपब्लिकन नेते सयाजी वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार सुनील खोब्रागडे, समाजवादी पार्टीचे राज्य महासचिव राहुल गायकवाड, ॲड. जयमंगल धनराज, सतीश डोंगरे, पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे, मुंई प्रदेश अध्यक्ष मंगेश पगारे, दिवंगत रामविलास पासवान यांच्या दलित सेनेचे नेते रवी गरुड, सीपीआयएमएल नेते श्याम गोहिल उपस्थित होते.

## तृतीयपंथीयांवर गुन्हा दाखल

**पनवेल :** अश्लिल हावभाव करणाऱ्या तृतीयपंथीयांवर कळंबोली स्टील मार्केट परिसरात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कळंबोली स्टील मार्केट परिसरात मोठ्या प्रमाणात तृतीयपंथ तेथील मोकळ्या रस्त्यावर तोकडे कपडे परिधान करून रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना टाळ्या वाजवून बिभत्स हावभाव आणि अश्लिल चाळे करीत असल्याच्या अनेक तक्रारी कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आल्या होत्या. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अजय चव्हाण व त्यांच्या पथकाने या परिसरात छापा टाकून दोघा जणांवर गुन्हे दाखल केले आहे.

**पान १ वरुन**

## पनवेलमध्ये कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी म्हटले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महायुती सरकारने रक्षाबंधनाआधीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून भगिनींना ओवाळणी दिली आहे, तर महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचे सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले.

या वेळी सोनाली महाडिक यांनी, विरोधक ही योजना पुढे बंद होईल असे सांगत आहेत, ते खरं आहे का, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले. त्यावर तुम्ही चांगला प्रश्न विचारलात. जोपर्यंत महायुतीचे सरकार आहेत तोपर्यंत हे पैसे तुम्हाला निश्चितपणे मिळतील, असे त्यांनी स्पष्ट केले. ललिता कदम यांनीही या वेळी उपमुख्यमंत्र्यांशी संवाद साधत माझ्या मुलीने म्हणजे तुमच्या भाचीने तुमचे खास आभार मानले आहेत, असे सांगितले.

या वेळी महिलांनी आणलेल्या राख्या जमा करण्यात आल्या. या राख्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात येणार आहेत. त्याचबरोबर उपस्थित महिलांनी आमदार प्रशांत ठाकूर यांनाही राख्या बांधल्या. लाडकी बहीण योजनेचे १४०० फॉर्म भरणाऱ्या हरजिंदर कौर यांच्यासह इतर महिलांचे मान्यवरांकडून कौतुक करण्यात आले.

## जासई येथे १ सप्टेंबरला भव्य आगरी समाज मेळावा

या नियोजन सभेस परिषदेचे सरचिटणीस दीपक म्हात्रे, डी.बी. पाटील, संतोष केणे, शरद म्हात्रे, दीपक पाटील, ॲड. पी.सी. पाटील, संतोष घरत, विजय गायकर, चंद्रकांत पाटील, रघुनाथ पाटील, डॉ. यशवंत, सुरेश पाटील, वासुदेव भोईर, प्रकाश भोईटे आदी उपस्थित होते. या वेळी भूमिपुत्रांच्या लेखी समस्या तसेच निवेदने कमिटीपुढे सादर करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी जे.डी. तांडेल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून १ सप्टेंबरच्या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

**दुखवटा**

## चंद्रकांत तेलंगे



**धाटाव** : रोहा हेटवणे येथील चंद्रकांत माणिकराव तेलंगे यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते वय ७४ वर्षांचे होते. हेटवणे गावचे माजी सरपंच कै. माणिकराव बाजीराव तेलंगे यांचे ते ज्येष्ठ पुत्र आणि रोह्याचे माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांचे ते मामा होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची दशक्रियाविधी सोमवारी (दि.१९) उद्धर रामेश्वर येथे तर तेरावे धार्मिककार्य गुरुवारी (दि.२१) हेटवणे येथील निवासस्थानी होणार आहे.

## कामोठे आणि खारघरमध्ये भाजप कार्यकारिणींची बैठक उत्साहात

# विधानसभा निवडणुकीत आपल्याला मोठे यश मिळेल

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला विश्वास

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र एकसंघ ठेवण्यासाठी खऱ्या अर्थाने भारतीय जनता पक्षाने काम केले. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यांने त्यांच्यावर सोपावलेली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली तर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्या मोठे यश मिळेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. १७) कामोठ्यामध्ये कार्यकारणी बैठकीमध्ये व्यक्त केला.




कामोठ्यातील सेक्टर १५ मधील आगरी समाज हॉलमध्ये भाजप कमोठे मंडळाच्या विस्तारीत कार्यकारणीची बैठक झाली. या बैठकीमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पक्ष बांधणी आणि कार्यकत्या जोडणीबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठे मंडळ संपर्कप्रमुख नितीन कांदळगावकर, ओबीसी मोर्चाचे राजेश गायकर, कामोठे मंडळाचे अध्यक्ष रवींद्र जोशी, सरचिटणीस विजय चिपळेकर, सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, माजी नगरसेवक दिलीप पाटील, गोपीनाथ भगत, विकास करत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, अरुणा प्रदीप भगत, शिला भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, भाऊ भगत, विद्या तामखेडे, संतोष म्हात्रे, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये भटके विमुक्त सेल कामोठे मंडळ अध्यक्षपदी रावसाहे बुधे, बुद्धिजीवी सेल कामोठे मंडळाध्यक्षपदी डॉ. अनिल पराडकर आणि कामोठे मंडळ ज्येष्ठ नागरिक सेल अध्यक्षपदी मोहन जोशी यांची निवड करण्यात आली असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

या वेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये अधिकाधिक मताधिक्य मिळवून आमदार प्रशांत ठाकूर यांना चौथ्यांदा आमदार बनवायचा आहे हा संकल्प सर्वांनी करा तसेच सर्तकतेने काम करून महायुती सरकाच्या योजनांची माहिती सर्व नागरिकांपर्यत्त पोहचवा, असे सांगितले.

# 'महायुती सरकारच्या योजना सर्वांपर्यंत पोहचवा'

**खारघर : रामप्रहर वृत्त**


कार्यकर्त्यांनी अधिकाधिक उर्जेने काम करून केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकारने नागरीकांच्या विकासाठी सुरू केलेल्या योजना या सर्वांपर्यत्त पोहचवा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये केले.

खारघरमधील लिटील व्हर्ल्ड मॉलमध्ये भारतीय जनता पक्ष खारघर मंडळाची (दि. १८) विस्तातीत कार्यकारणी बैठक रविवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत आणि शहर अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या बैठकीला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, अमरीश मोकल, शहर अध्यक्ष प्रविण पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, किर्ती नवघरे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, हरेष केणी, अभिमन्यू पटील, पापा पटेल, माजी नगरसेविका अनिता पाटील, नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, साधना पवार, नितेश पाटील, आरती नवघरे, अजय माळी, राजेंद्र मांजरेकर, अक्षय लोखंडे, कंचन बिर्ला, अमर उपाध्याय, बीना गोगरी, गीता चौधरी, संध्या शारबिद्रे, संतोष शार्मा, राजेंद अगरवाल, संजय घरत, सचिन वासकर, विजय पाटील, रमेश खेडकर, ॲडव्होकेट सुमन सहाय, प्रविण बेरा, रुपेश चव्हाण, वासुदेव पाटील, दत्ता ठाकूर, सुरेश ठाकूर, अंकिता वारंग, सीमा खडसे, मधुमिनता जेना, विनोद ठाकूर, संदीप माघाडे, निलम विसपुते, दुर्गा बंसल, स्नेहल बोधाई, डॉ. ज्योती जाधव, प्रिया दळवी, सोनल लाहा, अश्विनी भुवड, दिलीप जाधव, संजय मुळीक, रामचंद्र पाटील, मिनाक्षी ओसवाल, नवलकुमार मोरे, शफी पटेल, पप्पू चौरसिया, दत्ता कांबडी, तुकाराम कंटाळे, केतन नवघरे, विठ्ठल घोलवे, प्रिया हणमंते, शैलेंद्र त्रिपाठी, गझे सिंग यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



## उरण आगारातून गणपतीसाठी जादा एसटी बसची व्यवस्था



**उरण : बातमीदार**

गणेशोत्सव काळात उरण आगारातून कोकणात जाण्यासाठी जादा बसेसची मागणी कोकणवासीय उत्कर्ष संस्थेतर्फे करण्यात आली होती. संस्थेच्या मागणीला महामंडळाचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. दिवसा रातराणी गाड्यांची मागणी करण्यात आली होती. या मागणीचा विचार करून मुंबई सेंट्रलचे महाव्यवस्थापक (वाहतूक) शिवाजी जगताप, उरण आगार प्रमुख सतीश मालचे यांनी खालीलप्रमाणे गाड्या उपलब्ध करून दिल्या आहेत.

५ सप्टेंबर रोजी उरण ते खेड, सुटण्याची वेळ सकाळी ७ वाजता. उरण ते गुहागर, सकाळी ७:३० वाजता. उरण ते दाभोळ बंदर, सकाळी ८ वाजता. उरण ते राजापूर रात्री ८ वाजता आणि ६ सप्टेंबर रोजी उरण ते खेड सकाळी ७ वाजता. उरण ते गुहागर सकाळी ७:३० वाजता ह्या सर्व गाड्या ऑनलाईन बुकिंगद्वारे फुल झाले आहेत. प्रवाशी वर्गाचा चांगला, उत्तम प्रतिसाद यावेळी मिळाला आहे. महामंडळचे (वाहतूक) महाव्यवस्थापक शिवाजी जगताप, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे, उरण आगार व्यवस्थापक सतीश मालचे, वाहतूक निरीक्षक अमोल दराडे, उरण आगारातील कर्मचारी महेश गोसावी, रामनाथ म्हात्रे व इतर कर्मचारी अधिकाऱ्यांचे कोकणवासीय उत्कर्ष संस्थेचे कार्याध्यक्ष नंदकुमार साळवी, सचिव रवींद्र चव्हाण यांनी आभार मानले आहेत.

## अलिबाग भवनासाठी सर्वतोपरी सहकार्य -आमदार प्रशांत ठाकूर

**कळंबोली : बातमीदार**

अलिबाग ही क्रांतीची आणि संस्कृतीची भूमी आहे. या भूमीतून अलिबाग कर जेथे प्रवेश करतात ते तिथे यशस्वी होतात. निरूपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या निरूपणाची महती जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचली आहे. अलिबागमधील चरीचा संप हा ऐतिहासिक आहे. अलिबागमधील रहिवासी पनवेलमध्ये स्थिरावून ते पनवेलकर झालेले आहेत. त्यांनी ठरवलेले अलिबाग भवन हे निश्चितच साकारणार असून त्यासाठी मी माझ्या परीने सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल येथे दिले.



### निधीसाठी नाटकाचा पनवेलमध्ये प्रयोग

अलिबागहून नवी मुंबई, पनवेल मुंबईमध्ये स्थायिक झालेल्या अलिबाग मधील रहिवाशांना कायमस्वरूपी एक व्यासपीठ, सभागृह, राहण्याची व्यवस्था, सांस्कृतिक कार्यालय असावे यासाठी अलिबाग कर पनवेल मध्ये अलिबाग भवन बांधण्यासाठी सरसावले आहेत. गेल्या अनेक वर्षापासून यासाठी अलिबाग मधील समाज बांधव या कामासाठी झटत आहेत. यासाठी निधीची आवश्यकता मोठी आहे. अलिबाग भवन होण्यासाठी मोठा निधी जमावा यासाठी पनवेलमधील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हरवलेल्या पत्त्यांचा बंगला नाटकाचा नाट्यप्रयोग शनीवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला होता. या नाटकातून उत्पन्न मिळालेला निधी हा अलिबाग भवन बनवण्यासाठी वापरला जाणार असल्याचे अलिबाग तालुका रहिवासी संघाचे अध्यक्ष आल्हाद पाटील यांनी सांगितले आहे.

अलिबाग तालुक्यातील जवळपास ३५०० कुटुंबे मोठ्या संख्येने पनवेल नवी मुंबई या परिसरात कायमचे वास्तव्य करून आहेत पनवेल मधील अलिबागमधील समाज बांधव हा एकत्रित यावा, एकमेकांच्या विचारांचे आदान प्रदान व्हावे व अलिबाग मधील समाज बांधवांना हक्काचे कायमस्वरूपी एखाद्या सभागृह असावे यासाठी अलिबाग मधील रहिवाशी मोठ्या दिमतीने सरसावले आहेत. पनवेलमध्ये दहा गुंठ्याचा भूखंड घेऊन त्यावर अलिबाग भवन उभारावे ही संकल्पना मांडण्यात आली. ही संकल्पना सत्यात उतरावी यासाठी अलिबाग भवनाकरता लागणारा मोठा निधी संकलित करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.

याचाच एक भाग म्हणून पनवेलमधील फडके नाट्यगृहात शनिवारी सायंकाळी एका नाटकाच्या प्रयोग आयोजित केला आहे. या कार्यक्रमास पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, संघाचे अध्यक्ष आल्हाद पाटील, कार्याध्यक्ष सतीश पाटील, उपाध्यक्ष महेंद्र वावेकर, सचिव एन जी पाटील, खजिनदार विवेक बाजी, भालचंद्र पाटील, अनंता भोपी,ड.शेळके ॲड. तेलंगे, अविनाश पाटील, राकेश पाटील, सुहास पाटील, अलका कोळी/तोडणकर आदी उपस्थित होते.

नाटकाच्या तिकीट विक्रीतून मिळणारे उत्पन्न हे अलिबाग भवनासाठी वापरले जाणार आहे. अलिबाग भावनासाठी मोठ्या संख्येने अलिबाग मधील रहिवाशी नागरिक तन–मन–धन अर्पण करून पुढे सरसावले आहेत. आपल्या हक्कासाठी आपल्या हक्काचे एखादे सभागृह अलिबाग भवन पनवेलला येणाऱ्या नागरिकांना राहण्याची उत्तम सोय व्हावी, सांस्कृतिक कार्यक्रम, लग्न समारंभ व अन्य कार्यक्रम करता यासाठी सुसज्ञ असे सभागृह असावे अशी संकल्पना या अलिबाग भवनमधून साकारण्यात येणार असल्याचे आल्हाद पाटील यांनी सांगितले आहे. सूत्रसंचालन प्रसाद म्हात्रे यांनी केले.

## निवडक

### गोदामातून स्टीलच्या पाईपची चोरी

**पनवेल :** गोडावूनमध्ये असलेल्या साडे १० लाख रुपयांच्या स्टील पाईपची चोरी झाल्याची घटना कळंबोली येथे घडली. रवींद्र अंगारा यांचा स्टील खरेदी विक्रीचा व्यवसाय असून त्यांच्या गोडावूनमध्ये अज्ञातांनी चोरी करून साडे १० लाख रुपये किंमतीच्या पाईपचा माल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### करंजाडेतून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** बॅग व हजार रुपये घेऊन एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रणाली अशोक तायडे (३१ रा.करंजाडे) असे या महिलेचे नाव असून रंग गहुवर्णीय, अंगाने सडपातळ, उंची चार फुट पाच इंच, डोक्याचे केस लांब व सोनेरी रंग केलेले, डोळे काळे, अंगात गुलाबी कुर्ती व पांढरी लेगीज, पायात जोडव्या तसेच हिरवी सॅण्डल गुलाबी पर्स आहे. तिला हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा हवालदार ए.एस. डोईफोडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





**उरण : रक्षाबंधन सणासाठी बाजारात आकर्षक राख्या विक्रीस आल्या आहेत. लाडक्या भावासाठी कोणती राखी घ्यावी या विचारात असलेली महिला.** (छाया : दिनेश पवार)

## पनवेलमध्ये गणेशमूर्ती कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्यावतीने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शनिवारी (दि. १७) पर्यावरण दक्षता मंच, पनवेल यांच्या सहकार्याने इंदुबाई वाजेकर इंग्रजी शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्तीची कार्यशाळा घेण्यात आली.

महापालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावरती भर दिला जात आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने नागरिकांना सप्तसूत्रीचे पालन करण्याचे आवाहन केले जात आहे. या सप्तसूत्रीमधील दुसरे सूत्र म्हणजे 'पुढील पिढ्यांना समृद्ध वारसा देण्याच्या दृष्टीने घरातल्या लहान मुलांच्या हस्ते गणेशमूर्ती तयार करून त्याची प्रतिष्ठापना करावी'. या सूत्राच्या अमंलबजावणीसाठी उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार पर्यावरण दक्षता मंच, पनवेल यांच्या सहकार्याने पनवेल येथील इंदुबाई वाजेकर इंग्रजी शाळेत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

तीन टप्प्यात होणाऱ्या या कार्यशाळेमध्ये या शनिवारी शाडू मााती मळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. येत्या पुढील दोन शनिवारी मूर्ती बनविणे आणि रंगविणे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी महापालिकेचे पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, शाळेचे अध्यक्ष ही.सी. म्हात्रे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. याबरोबर तनय दीक्षित, स्मित राऊत, उल्हास ठाकूर, धनंजय मदन, प्रियांका रणदिवे आणि प्रल्हाद बोडके यांनी मार्गदर्शन केले.



## जासई हायस्कूलमध्ये शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेचा कार्यक्रम



**उरण : रामप्रहर वृत्त**

जासई हायस्कूलमध्ये उरण समालोचक असोसिएशनचा शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेचा कार्यक्रम रविवारी (दि. १४) झाला. इयत्ता बारावी शिकत असलेल्या उरण तालुक्यातील एकुण १३ मुलींना एक लाख ३० हजार रुपये रकमेचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

ह्या कार्यक्रमास चिरले ग्रामपंचायतीचे सरपंच सुधाकर पाटील, ऑल इंडियापोर्ट डॉक वर्कस कामगार नेते सुरेश पाटील, रवी घरत, जासई हायस्कूलचे प्राचार्य घाग सर, गुरुनाथ तांडेल, मयुर माणीक म्हात्रे (प्रो.प्रा. मयर सिक्युरिटी फौर्स), आदित्य घरत, यश म्हात्रे, भा.ज.पा. जासई महिला अध्यक्ष मनिषा घरत, क्रांती महीला मंडळ अध्यक्ष सुमन म्हात्रे, विना घरत, सृष्टी म्हात्रे, जयश्री ठाकूर, नंदा म्हात्रे (राजगड जि.भा.ज.पा. महिला सदस्य), संध्या रविंद्र पाटील (ग्रा.स. नवघर), रविंद्र पाटील (नवघर) आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रायगडभुषण नितेश पंडित यांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना उरण समालोचक असोसिएशनचे अध्यक्ष प्रसाद भोईर यांनी केले तर आभार संस्थेचे सल्लागार आत्माराम म्हात्रे यांनी मानले. असोसिएशनचे खजिनदार प्रल्हाद कासुकर, सचिव मेघनाथ मढवी, उपाध्यक्ष विपुल पाटील, सदस्य जयदास ठाकूर, प्रकाश ठाकूर, नवनाथ म्हात्रे, हितेश म्हात्रे, सचिन केणी, प्रवीण म्हात्रे, सुनील पाटील, कैलास पाटील, विनोद घरत, विराज मढवी या सर्वांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य घाग सर यांनी भुषवले.

उपस्थित सर्व मान्यवरांनी आपल्या मनोदयातुन उरण समालोचक असोसिएशनच्या सामाजिक कार्याचे भरभरून कौतुक केले व पुढील कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# बहिणींना ओवाळणी

भावा-बहिणीच्या अतूट नात्याचे प्रतिक असणारा रक्षाबंधनाचा सण सोमवारी आहे. या सणापूर्वीच महायुती सरकारमधील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या भावांनी राज्यातील महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत दोन हफ्यांची रक्कम बँक खात्यावर अदा केली. ही ओवाळणी विशेष मानली जातेय.

**राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून पात्र महिला लाभार्थ्यांना दरमहा दीड हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. महिला सबलीकरण धोरण ठरविणारे महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य आहे. माझी कन्या भाग्यश्री, लेक लाडकी, लखपती दिदी, शिक्षण शुल्कमाफी या मुलींसाठी योजना राज्य सरकारने सुरू केल्या. एवढ्यावरच न थांबता आता महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, त्यांच्या आरोग्य व पोषणात सुधारणा होण्यासोबतच कुटुंबात त्यांची निर्णायक भूमिका ठाम होण्यास मदत होणार आहे. योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली होती. रक्षाबंधनाआधी सर्व पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये जुलै व ऑगस्ट महिन्याचे एकूण तीन हजार रुपये जमा झाले आहेत. आतापर्यंत एक कोटी ३५ लाख महिला लाभासाठी पात्र ठरल्या आहेत. त्यापैकी एक कोटी तीन लाख महिलांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आली आहे. महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. काही महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. प्रत्येक पात्र भगिनीला योजनेचा लाभ दिला जाईल. दोन कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या योजनेचा शानदार शुभारंभ शनिवारी पुण्यात झाला. या सोहळ्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्यासह अन्य मंत्रीगण, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेतील रक्कम वाढविण्याचे सुतोवाच केले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी, विकसित भारत करणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वप्न आहे. महिलांचा विकास झाला, तरच भारत विकसित होऊ शकतो असे पंतप्रधान कायम म्हणतात. त्यामुळेच राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी, असा आमचा प्रयत्न असल्याचे सांगितले. ही योजना म्हणजे आम्ही महिलांप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता आहे, रक्षाबंधनानिमित्त दिलेली ओवाळणी आहे. आईचं आणि बहिणीचं प्रेम जगातील कोणतीही संपत्ती विकत घेऊ शकत नाही. माझ्या माय माऊलीला पंधराशे रुपयांचे मोल समजते, असेही ते म्हणाले. उपमुख्यमंत्री पवार यांनी, या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, हसू दिसून येत आहे. रक्षाबंधन सणानिमित्ताने ओवाळणी म्हणून भेट दिली आहे, असे नमूद केले. महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही सरकार महिलांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. पूर्वी चूल आणि मूल या जोखडात अडकलेली स्त्री शिक्षण घेऊन पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागली. या महिलावर्गाला आणखी पुढे जाण्यासाठी महायुती सरकारने आर्थिक पाठबळ दिले आहे.**

# उपोषण करण्यात कर्जतकरांचा हात कुणी धरणार नाही...





समाजाच्या समस्या सुटाव्यात किंवा वैयक्तिक न्याय मिळावा यासाठी मोर्चा, साखळी उपोषण, आमरण उपोषण, आंदोलन, आत्मदहन आदी हत्यारे उचलली जातात. आता माहितीचा अधिकार हेदेखील तीक्ष्ण हत्यार समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पाठपुराव्याने आले आहे, पण या हत्याराचा दुरुपयोग होताना दिसतो असो. कर्जतकर उपोषणाचा जास्तीत जास्त वापर करतात कारण त्याचा रिझल्ट हमखास व लवकर होतो. काहींनी दहा-अकरा तर काहींनी अठरा-वीस वेळा उपोषणे करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे उपोषण करण्यात कर्जतकर माहिर आहेत.

१९८० च्या दशकात कर्जत ग्रुप ग्रामपंचायतीसाठी पळसदरी तलाव की पेज नदीमधून पाणी योजना असावी यासाठी झालेले उपोषण अनेकांच्या स्मरणात राहील असे होते. तत्कालीन आमदार तुकाराम सुर्वे यांचा आग्रह पेज नदी वर पाणी योजना करून कर्जत आणि १९ गावांची पाणी योजना करावी असा होता तर अनंत जोशी, रमेश चंदन आदींचा आग्रह रेल्वेच्या अखत्यारीत असलेल्या पळसदरी तलावाच्या पाण्यावर योजना करावी. म्हणून उपोषणाचे हत्यार वापरले होते. त्यावेळी कर्जत ग्रामपंचायतीसाठी पळसदरी तलावाच्या पाण्यावर योजना केली व दहिवलीसह १९ गावांसाठी पेज नदीच्या पाण्यावर योजना केली. त्यावेळी असलेल्या काँग्रेस सरकारने दोघांनाही खुश ठेवण्याचा प्रयत्न केला होता. माथेरान मध्ये एका आजारी असलेल्या ज्येष्ठ नागरिकाला दवाखान्यात जाण्यासाठी रुग्णवाहिका न दिल्याने त्यांच्या मुलाने उपोषण केले आणि त्या मुद्यावर निवडणुकीत तत्कालीन सत्ताधाऱ्यांना सत्तेपासून दूर रहावे लागले होते.

पेण अर्बन बँक बंद झाली आणि अनेक ठेवीदारांचे पैसे अडकले. त्यावेळी उपोषणे करण्यात आली. कारण सर्वांत जास्त पैसे कर्जतकरांचे अडकले होते. ती उपोषणेही लक्षात ठेवण्यासारखी होती. कर्जतच्या उप जिल्हा रुग्णालयातील मनमानी विरुद्ध अनेकांनी उपोषणे केली होती. आरपीआय सारख्या राजकीय पक्षानेही उपोषण केले होते. यासाठी पत्रकारही मागे नव्हते. कर्जत तालुका मराठी पत्रकार संघानेही उपोषण केले होते. कर्जत चार फाटा ते भिसेगाव भागातील श्रद्धा हॉटेल आता बिकानेर पर्यंतचा रस्ता व्हावा यासाठीही उपोषण करावे लागले होते. एस. टी. आगारातील कर्मचाऱ्यांनीसुद्धा विविध मागण्यांसाठी उपोषणे केली होती. कर्जत शहरात 'ड' सत्ता प्रकारच्या जमिनी आहेत. त्यांची मुदत संपल्याने मोठा प्रश्न उभा राहिला होता. त्यावेळी अरुण गांगल यांच्या पुढाकाराने उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी तत्कालीन महसूलमंत्री अशोक चव्हाण यांनी तो प्रश्न सोडविला.

**खबरबात**
**विजय मांडे**

कोरोना काळाच्या आधी आणि नंतरही दहा - अकरा उपोषणे झाली. ॲड. कैलास मोरेंनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यातील बरीचशी यशस्वीही झाली. कुणी परस्पर जमिनी विकल्या म्हणून उपोषणे केली तर कुणी जागेतील अतिक्रमण काढावे म्हणून उपोषणे केली. एक उपोषण तर बरेच दिवस चालले. ते घरकुल मिळाले नाही म्हणून होते. पंचायत समितीच्या आवारात ते उपोषण होते. त्यानंतर ते अलिबागला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बरेच महिने होते. रेल्वेने जमिनी भूसंपादीत केल्या. त्यावेळी जास्त दर मिळावा म्हणूनसुद्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी त्याचे नेतृत्व ॲड. गोपाळ शेळके यांनी केले होते. इतकेच काय? कर्जतचे प्रवेशद्वार म्हणजे चारफाट्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी नारी शक्ती संघटनेने ज्योती जाधव यांच्या नेतृत्वाखाली उपोषण केले होते. ते यशस्वी झाले. कर्जत ठेकेदार संघटनेनेही वारंवार उपोषणे केली होती. या उपोषणांसाठी राहुल डाळिंबकर, अशोक भोपतराव, उदय पाटील आदी पुढाकार घेत असत.

पोलीस मित्र संघटनेचे रमेश कदम म्हणजे उपोषणाचे 'किंग'च म्हणावे लागेल त्यांनी आत्तापर्यंत तब्बल १८ उपोषणे केली आहेत. देवस्थान जमीन हडप केले प्रकरणी देवाच्या जमीनी देवाच्या नावे करण्यासाठी, बार्णे-साळोख रस्ता डांबरीकरण करण्यासाठी, महावितरण कंपनी गलथान कारभारात सुधारणा करण्यासाठी, ७/१२ उताऱ्याचे १५ रुपये पैकी ५ रुपये शासनाचे शुल्क जमा करणेसाठी अशा अनेक विषयांचा समावेश आहे. कर्जत तालुक्यातील माथेरानच्या डोंगरामध्ये असलेल्या आदिवासी वाड्यांच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर साकव बांधण्यात यावेत या मागणी साठी आदिवासी समाजाचे कार्यकर्ते जैतु पारधी यांनी उपोषण केले होते. साकव मंजूर करण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले होते. कर्जत इंग्लिश मिडीयम स्कुलच्या पालकांनीही शाळेच्या गलथान कारभाराविरुद्ध उपोषण केले होते. कर्जत तालुक्याचे टोक असलेल्या बडीस गावातील आदिवासींनीसुद्धा रस्त्यासाठी उपोषण केले होते.


माजी आमदार सुरेश लाड यांनीसुद्धा रस्त्यांची कामे सुरू व्हावीत म्हणून आमदार असताना फेब्रुवारी २०१९ मध्ये उपोषण केले होते. लगेचच रस्त्याची कामे सुरू झाल्याने त्यांनी उपोषण मागे घेतले. काल परवा सुद्धा एक उपोषण झाले. पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील निगुर्ले, तिघर, वरणे प्रास्तार कल्पतरू नावाची कंपनी विकासक म्हणून काम करीत आहे. तेथे स्थानिक युवकांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून ग्रामस्थांनी उपोषण केले होते. ते तब्बल चार दिवस चालले. कैलास म्हामले, अजित पवार हे युवक उपोषणास बसले होते. तीन दिवस झाले तरी न्याय मिळत नाही म्हणून ७० वर्षांच्या मनुबाई पवार यांच्यासह १४ महिला चौथ्या दिवशी उपोषणास बसल्या तेंव्हा प्रशासन हालले आणि मार्ग काढण्याच्या आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

गेल्या १२ ऑगस्ट पासून वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभारा विरूध्द संघर्ष समितीच्या वतीने साखळी उपोषण सुरू आहे. त्याची आज यशस्वीपणे सांगता होईल. असे चित्र आहे. गेली सात दिवस हे उपोषण ॲड. कैलास मोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. त्यांना रंजन दातार, राजाभाऊ कोठारी आदी कर्जतकर साथ देत आहेत. हे आंदोलन जनतेचे आहे, असे स्पष्ट करण्यात आले. या उपोषणाला कर्जतमधील बहुतांश संस्थांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, भाजपचे किरण ठाकरे, उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नितीन सावंत आदींनी भेट देऊन चर्चा केली. काहींनी यात राजकारण आणण्याचा प्रयत्न केला, मात्र वेळीच ॲड. मोरेंनी यात राजकारण आणू नका. अशी विनंती केल्याने त्यावर पडदा पडला. अधिकारी वर्गाने तीन-चार वेळा येऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. विशेष म्हणजे कर्जत तालुक्याचा कोणता भाग शहरी व कोणता भाग ग्रामीण आहे? हे त्या अधिकाऱ्यांना माहीत नाही. त्यावरून वीज समस्येचे किती गांभीर्य अधिकाऱ्यांना आहे? हे दिसते. आज सायंकाळी पाचच्या सुमारास वीज वितरणचे अधीक्षक अभियंता आर. बी. माने, उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंद्रे आदी उपोषण स्थळी आले. त्यांनी ड. कैलास मोरे, रंजन दातार, राजाभाऊ कोठारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चर्चा केली. अधिकारी वर्गाने मागण्या मान्य केल्याचे पत्र दिले. आणि उपोषणाची यशस्वी सांगता झाली. यावरून कर्जतकरांचा हात कुणी धरणार नाही हे पुन्हा एकदा सिध्द झाले...




# गुगल गुपचूप तुमचे बोलणे ऐकतेय? जाणून घ्या...

बरेचदा असे होते की आपण एखादी गोष्ट बोलतो आणि त्यानंतर काही वेळातच आपल्या मोबाईलमध्ये तीच गोष्ट दिसते. त्यावेळी आपल्याला तो योगायोग वाटू शकत असला तरी तसे नसते. आपल्या हातातील स्मार्ट फोन हा आपले बोलणे ऐकत असतो. त्यामुळेच ती गोष्ट दाखवतो जी आपण बोललेला असतो. गुगल वेळोवेळी आपल्या युजर्सना अनेक नवीन फीचर्स देत आहे. काही फीचर्स दिसतात तर काही हिडन असतात .




गुगलवर अनेक हिडन फीचर्स आहेत, ज्याबद्दल लोकांना माहिती नाही. अनेक वेळा गुगल तुमचे बोलणे गुपचूप ऐकत असतो. अशा परिस्थितीत तुम्ही सेटिंगमध्ये थोडासा बदल करून तुमची प्रायव्हसी सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे.

गुगलच्या मते, जेव्हा व्हॉइस आणि ऑडिओ क्टिव्हिटी सेटिंग्ज बंद केल्या जातात, तेव्हा Google सर्च, असिस्टंट आणि मॅप्स यांच्यासोबत केल्या जाणाऱ्या इंटरएक्शनमधून मिळालेले व्हॉइस इनपुट तुमच्या Google अकाऊंटमध्ये सेव्ह होत नाही.

गुगल वेळोवेळी आपल्या युजर्सना अनेक नवीन फीचर्स देत आहे. काही फीचर्स दिसतात तर काही हिडन आहेत. अनेक फीचर्सही डेटा आणि प्रायव्हसीशी देखील संबंधित आहेत, जी तुमच्या वेब आणि एप एक्टिव्हिटीमधून ऑडिओ रेकॉर्डिंग कलेक्ट करतात.

गुगलचं म्हणणं आहे की, ते केवळ कमांड्स ऐकण्यासाठी आणि मार्केटिंग एफर्ट्सना प्रोत्साहन देण्यासाठी हे करत आहेत. पण याकडे प्रायव्हसीचं उल्लंघन म्हणूनही पाहिले जात आहे. गुगल डेटा आणि प्रायव्हसी अंतर्गत ते कंट्रोल करण्याचा पर्याय देखील देतं. याच्या मदतीने तुम्ही व्हॉइस आणि ऑडिओ क्टिव्हिटी ऑन किंवा ऑफ करू शकता.

सर्वप्रथम, तुमच्या Android फोन किंवा टॅब्लेटमध्ये सेटिंग्ज ओपन करा आणि नंतर Googleवर जा. यानंतर Manage your Google account वर क्लिक करा आणि नंतर Data privacyवर जा. यानंतर History settingsमध्ये Web App Activityवर टॅप करा. Include voice and audio activity बॉक्स अनचेक करा.

# ...म्हणून समुद्राला नारळ अर्पण करतात!

श्रावण मासाची पौर्णिमाला आपण रक्षाबंधन म्हणून साजरी करतो हे तर सगळ्यांना माहित असेल. पण ह्या दिवशी 'नारळी पौर्णिमा' हीदेखील साजरी केली जाते. 'नारळी पौर्णिमा' ऐक उत्सव आहे ज्याला श्रावण महिन्यातील पौर्णिमाच्या दिवशी साजरी करण्याची पद्दत आहे.

श्रावण मास स्वतःमध्ये एक पवित्र मास आहे आणि त्यात श्रावणी पौर्णिमा आणखीन पवित्र मानली जाते. भारताच्या पश्चिम किनार्यावरील दमण आणि दीव, ठाणे, रत्नागिरी, कोकण इत्यादी महाराष्ट्रातील किनारी प्रदेशात ही नारळी पौर्णिमा साजरी केली जाते. मूळात महाराष्ट्राच्या दक्षिण पश्चिमी क्षेत्रामध्ये, कोकण तट येथे कोळी समुदायाचे लोकांमध्ये हा सण साजरा करण्याची पद्धत आहे.



**निमित्त**

ह्याला 'नारळी पौर्णिमा' हे नाव नारळामुळे मिळालं आहे. कारण ह्या दवशी नारळचा खूप महत्व असतं. ह्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण केलं जातं आणि नारळ भात याचं पूजेत महत्तव असतं. नारळ फळ हिंदू मान्यतेप्रमाणे सगळ्यात शुभ मानलं जातं. ह्याचं एक कारण असे देखील आहे की त्याचा प्रत्येक भाग जसे पाणी, पानं, फळ, केस सगळे कामास येतात. म्हणून पारंपारिकपणे कोणतेही नवीन कार्य सुरू करण्यापूर्वी नारळ फोडणे शुभ मानले जाते. तसेच मासेमारी आणि जल-व्यापारच्या सुरुवात करण्याआधी नारळ अर्पित केलं जातं.

नारळी पौर्णिमा हा एक सामाजिक आणि व्यावसायिक उत्सव आहे, कारण कोळी बांधवांसाठी समुद्र पवित्र आहे कारण ते त्यांच्या आयुष्य चालावण्याचे साधन आहे. तसेच नाव पण त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य अंग आहे त्यामुळे ते नावाचीदेखील पूजा करतात.

हा सण कोळी लोकांमध्ये मासेमारी आणि जल-व्यापाराची सुरुवात ठरवतो. पाण्यात सकुशल व्यापार करण्यासाठी लोकं समुद्र-देव वरुण यांची प्रार्थना करतात आणि त्यांचे पूजन करतात. पावसाळा हा माशांचा प्रजनन काळ आहे. अशात कोळी लोकं काही काळासाठी मासेमारी थांबवतात आणि त्यांचं सेवनपण करत नाही.

नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राची भरती सर्वाधिक असताना समुद्रात नारळ सोडलं जातं. समुद्राचा कोप होऊ नये तसेच जहाजे, नौका सुरक्षित रहाव्यात म्हणून कोळी बांधव या दिवशी समुद्राची पूजा करतात. समुद्र भरतीच्या वेळी, समुद्र लहरी खूप तीव्र असतात आणि अशात नारळाचा नैवेद्य म्हणजे त्याचा राग शांत करण्यासाठी अर्पण केला जातो असे मानले जाते.

हा सण साजरा करण्याची तयारीच्या रूपात कोळी आपली नाव सजवतात, त्यांना रंग-रोगण करतात आणि नाववर फुलांची माळा त्यांना अजूनच आकर्षित बनवते. ह्यादिवशी नारळाची करंजी देखील बनवली जाते. लोकं पारंपारिक पोशाखात पारंपारिक नृत्यदेखील करतात, ज्याला 'कोळी नृत्य' म्हणतात.

हा दिवस ज्याला मुख्यतः 'रक्षा बंधन' म्हणतात आणि महाराष्ट्राचे कोकण तट येथे 'नारळी पौर्णिमा' म्हणतात, भारताचे वेग-वेगळ्या भागात 'राखी पौर्णिमा', श्रावणी पौर्णिमा', 'उपाकर्म' किंवा 'अवनी अवित्तम' म्हणून देखील साजर केला जातो. जसे रक्षा बंधन भाऊ बहिणीचे अतूट बंधनाचा सण आहे त्याप्रकारे नारळी पौर्णिमा हा कोळी बांधवांचा व्यवसाय आणि समुद्र ह्यांच्यामधील असलेल्या बंधनाचा सण आहे. एकाच उत्सवाचे इतके वेगळे नाव आणि पद्धत हेच तर आपल्या देशाची 'विविधतेत एकता' दर्शवते.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**




**पनवेल : रक्षाबंधन सणानिमित्त दुकाने निरनिराळ्या राख्यांनी सजली असून महिलांनी गर्दी केली होती.** (छाया : सुबोध ठाकूर)

## आरोग्य प्रहर

# काळी मिरीच्या सेवनाने १००० रोग होतात बरे!

काळी मिरी सलाड, कापलेली फळं, डाळ किंवा भाज्यांमध्ये वापरली जाते. घरगुती इलाजासाठीही तिचा वापर केला जातो. काळ्या मिरीमध्ये औषधी गुण आहेत. या काळी मिरीचे कोणते रामबाण उपाय आहेत. त्यावर आज प्रकाश टाकूया.



अर्धा चमचा काळी मिरीची पावडर तुपात टाकून रोज सकाळी आणि संध्याकाळी खाल्ल्यास नजर तेज होते. दृष्टीदोष दूर होण्यास मदत होते.

काळी मिरीचे चार पाच दाणे, किशमिशचे १५ दाणे तोंडात टाकून चघळा. त्यामुळे खोकला दूर होतो. मधात काळी मिरीची पावडर टाकून तीन चार वेळा तिचं चाटण घेतल्यास खोकला थांबतो. काळी मिरी ही उत्तम अँटीऑक्सिडंट आहे. काळी मिरी अँटीबॅक्टेरिअलचं काम करते. मँगनीज आणि लोहासारख्या पोषक तत्त्वांचा तो चांगला स्त्रोत आहे. शरीराचं कार्य उत्तम ठेवण्यास त्याने मदत होते.

गॅस झाल्यावर पोट फुगल्यास काळी मिरी खा. त्यामुळे गॅसची समस्या दूर होते. काळी मिरीला सुईने छिद्र पाडा आणि ती आगीवर भाजा. त्यातून निघालेला धूर नाकाने शरीरात घ्या. हा प्रयोग केल्यास डोकेदुखी बंद होते. उचकी येणंही बंद होतं.

२० ग्रॅम काळी मिरी , जिरे १० ग्रॅम आणि साखर १५ ग्रॅम घेऊन त्याचं मिश्रण करा. त्यानंतर ते पाण्यात टाकून सकाळी संध्याकाळी घ्या. मूळव्याधापासून राम मिळेल.

पांढरी मिरी डोळे आणि कपाळासाठी उपयुक्त मानली जाते. पीठात देशी तूप घाला. त्यात थोडी साखर टाकून सफेद काळी मिरी पावडर टाका. आणि त्याचं सकाळी तसेच संध्याकाळी सेवन करा. त्वचेवर फोडं आले असतील तर काळी मिरीवर थोडं पाणी टाकून ती दगडावर घासा. त्यानंतर करंगळी बाजूच्या बोटाने फोडीवर ते मलम लावा, त्यामुळे फोडी गायब होते.

तुमचा रक्तदाब कमी होत असेल तर दिवसातून दोन तीन वेळा पाच दाने काळी मिरी आणि किशमिशचे २१ दाणे खा. काळी मिरी, हिंग, कापूर (सर्व पाच पाच ग्रॅम) यांचं मिश्रण बनवा. त्यानंतर राई एवढ्या गोळ्या बनवा. प्रत्येक तीन तासानंतर एक गोळी खाल्ल्यावर उलटी, दस्त बंद होतील.

सर्दी झाल्यावर काळी मिरीचे चार पाच दाणे वाटून एक कप दूधात गरम करून प्या. सकाळ संध्याकाळी हे दूध प्यायल्यास आराम मिळतो. काळ्या मिरीचा चहा घेतल्यावर सर्दी पडसे, खोकला आणि व्हायरल इन्फेक्शनपासून आराम मिळतो. काळी मिरीमुळे पाचन क्रियाही सुधारते.

# पेण : सात ग्रामपंचायती झाल्या क्षयरोगमुक्त

## शासनाच्या वतीने पुरस्काराने सन्मान




**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील सात ग्रामपंचायतींना क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

पेण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी सविता कांबळे, विस्तार अधिकारी समीर सानप तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र कामार्ली, जिते येथील वैद्यकीय अधिकारी यांच्यासह सातही ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच ग्रामसेवक, आरोग्य सेवक समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आशाताई या वेळी उपस्थित होते.

या वेळी कोपर ग्रामपंचायत सरपंच नवनाथ कृष्णा म्हात्रे, निधवली ग्रामपंचायत सरपंच सुचिता संतोष वाघमारे, बोर्झे ग्रामपंचायत सरपंच सुषमा निलेश पाटील, कोप्रोली ग्रामपंचायत सरपंच प्रवीण जगन्नाथ पाटील, सावरसई ग्रामपंचायत उपसरपंच योगेश सिताराम दिवेकर, आमटेम ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मण तांबोळी, कासू ग्रामपंचायत आरोग्य सेवक राजेंद्र काशिनाथ म्हात्रे यांच्या उपस्थितीत क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला.

या सर्वांना मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधींची प्रतिकृती व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सलग सुट्ट्यांमुळे जिल्ह्यात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले होते. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

जिल्ह्यात शनिवारी (दि.१७) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ४११ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख ७३ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे.

वाहतूक पोलिसांच्या धडक कारवाईमुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# पोलीस पाटीलांचे मानधनासाठी निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटलांना मागील तीन महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे पोलीस पाटील नाराज आहेत. सणासुदीच्या तोंडावर त्यांची कुचंबना होत आहे. परिणामी न्यू महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी नुकतेच रायगड अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे व तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांना मानधन मिळावे, अशा मागणीचे निवेदन दिले.

रक्षाबंधन, गोपाळकाला व गणपती सण आला असून सणासुदीला खर्च कसा भागवावा असा प्रश्न पोलीस पाटलांच्या समोर उभा ठाकला आहे. गणपतीत दिवस-रात्र आपल्या गावात कुठे ही वादविवादाचा प्रकार घडू नये म्हणून पोलीस पाटील आपली ड्युटी बजावत असतात, मात्र प्रशासनाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहेत. परिणामी पोलीस पाटील प्रचंड नाराज आहेत.

निवेदन देतेवेळी पोलीस पाटील संघटना रायगड जिल्हा कार्याध्यक्ष राम सावंत, उपाध्यक्ष श्रीधर गोळे, सचिव महेश शिरसे, नवी मुंबई अध्यक्ष संजय पाटील, खजिनदार संजय बारस्कर उपस्थित होते.



**गावात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पाटील महत्त्वाची भूमिका बजावतात. हे काम ते अतिशय निष्ठेने व प्रामाणिकपणे करतात. त्यांना शासनाकडून जे काही मानधन मिळते ते तरी किमान वेळेत मिळावे ही अपेक्षा आहे. हे मानधन मिळण्यासाठी प्रशासनाला विनंती केली आहे.**

**– श्रीधर गोळे, उपाध्यक्ष, पोलीस पाटील संघटना**

या वेळी अप्पर जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी, तुम्हाला लवकरात लवकर मानधन मिळेल यासाठी आम्ही प्रयत्न करू, असे आश्वासन दिले.

# कर्जत भात गिरणी सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी शरद लाड



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत भात गिरणी सहकारी प्रक्रिया संस्थेच्या अध्यक्षपदी शरद लाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सदस्यपदाच्या झालेल्या निवडणुकीत सर्वच्या सर्व सदस्य सहकार पॅनलचे निवडून आल्याने ही निवडणूक बिनविरोध होईल, असे चित्र स्पष्ट झाले होते.

निवडणूक निर्णय अधिकारी सुनील दांगट यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत भात गिरणी सहकारी प्रक्रिया संस्थेची निवडणूक पार पडली. अध्यक्षपदासाठी शरद लाड यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सुनील दांगट यांनी जाहीर केले.

या वेळी सहकार अध्यक्ष सिताराम मंडावळे, संचालक परशुराम घारे, बाळु थोरवे, रवींद्र मांडे, विनय वेखंडे, दत्तात्रेय भोईर, भरत भासे, पांडुरंग देशमुख, दत्ता चव्हाण, हेमंत ठाकरे, व्यवस्थापक दयानंद पाटील, नामदेव मोडक, गोविंद जाधव, महादेव लोंगले, प्रविण देशमुख, अनिल रोकडे, नंदकुमार मोरे, छाया वेखंडे, वंदना देशमुख, भगवान चव्हाण आदी उपस्थित होते.

# पेणमध्ये वृद्ध व्यक्तीकडून तरुणीशी अश्लिल चाळे

## पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

एकीकडे स्त्री अत्याचाराच्या घटनांनी राज्यात महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पेण शहरातील चावडीनाका येथे अमूल आईस्क्रीम कॉर्नर येथील ६२ वर्षीय सुबोध जोशी या व्यक्तीने दुकानात ग्राहक म्हणून आलेल्या २० वर्षीय तरुणीसोबत अश्लिल चाळे करून तिची छेड काढल्याची घटना घडली आहे.




चावडीनाका येथील अमूल आईस्क्रीम पार्लरमध्ये आईस्क्रीम आणण्यासाठी फिर्यादी तरुणी गेली होती. त्या व्यक्तीने तरुणीला दुकानाचे टेरेस दाखविण्याचा बहाणा करून आरोपी सुबोध जोशी (रा. लोकमान्य हौ. सोसायटी) याने जिना चढत असताना तिचा हात पकडला व तिच्या मनात लज्ज्ञा उत्पन्न होईल, असे हातवारे आणि अश्लिल चाळे केल्याची तक्रार तरूणीने पेण पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार दर्शना पाटील या करीत आहेत.

# वरसे येथील शिबिरात ३०० नागरिकांची नेत्रतपासणी



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वरसे गावात लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि ग्रामपंचायत वरसे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रचिकित्सा शिबिराचे रविवारी (दि.१८) आयोजन करण्यात आले. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल ३०० नागरिकांनी सहभाग नोंदवला. शिबिराचे उद्घाटन सरपंच अमित मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिरामध्ये मोफत नेत्र तपासणी, चष्म्यांचे वाटप, तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया यांसारख्या सेवांचा समावेश होता. हे शिबिर विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आले होते. ज्यांना अशा सुविधांचा लाभ घेण्यासाठी शहरात जावे लागत होते. सरपंच अमित मोहिते यांनी, ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दारातच आवश्यक आरोग्यसेवा मिळावी. त्याचबरोबर, त्यांनी असे कार्यक्रम भविष्यातही आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली.

या वेळी ग्रामसेवक सावंत, सदस्य मामा सुर्वे, उतेश कांबळे, तुषार शिंदे, महेश देशमुख, रामशेठ म्हात्रे, नागेश शिंदे, माजी सरपंच नरेश पाटील, राकेश करंजे, दुर्गेश नाडकर्णी, अतेश पडवळ, किशोर पाटील, गणेश शिवलकर तसेच स्वामी विवेकानंद रिसर्च कुंदन प्रसाद, ग्रामपंचायत सदस्य आणि कर्मचारी उपस्थित होते.

# खारपाडा येथील राजिप शाळेत सर्प जनजागृतीपर व्याख्यान



**पेण : प्रतिनिधी**

युवा फ्रेंड सर्कल फाउंडेशन (एनजीओ) व ऑर्गनायझेशन फॉर वाइल्डलाईफ स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने खारपाडा येथील जि. प. सेमी इंग्लिश उच्च प्राथमिक शाळेत सर्प जनजागृती व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून युवा फ्रेंडस सर्कल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कैलास घरत, शिवतेज युवा फाउंडेशन रायगडचे अध्यक्ष हेमंत पाटील, सुचित्रा सुरेंद्र समेळ, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या माधुरी घरत, अभिजीत घरत हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन युवा फ्रेंडस सर्कल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कैलास घरत यांनी केले होते. या वेळी ऑर्गनायझेशन फॉर वाइल्डलाईफ स्टडीज उपाध्यक्ष अभिजीत विठोबा घरत यांनी विषारी साप, बिनविषारी साप, तोंड ओळख, मानव सर्प संघर्ष टाळण्यासाठीच्या उपाययोजना विषद केल्या. त्यामुळे सापांविषयी विद्यार्थ्यांच्या मनात, समाजात असलेले समज आणि गैरसमज दूर केले, बिनविषारी साप मारण्याची चूक भावी पिढी करणार नाही.

यापुढेही असेच शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम आम्ही राबविणार असल्याची माहिती युवा फ्रेंडस सर्कल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कैलास घरत यांनी दिली.

# अलिबाग येथे फोटोग्राफी कार्यशाळा उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील छायाचित्रकारांना नवीन, अद्ययावत तंत्रज्ञान अवगत व्हावे व छायाचित्रकार एका उंचीवर नेण्यासाठी नेहमीच अग्रेसर असलेल्या रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडिओग्राफर्स असोसिएशन आणि कॅनॉन कंपनीच्या संयुक्त विद्यमाने जागतिक छायाचित्र दिनाचे औचित्य साधून अलिबाग येथील वेव्हज हॉटेलच्या सभागृहात मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




लॉगमध्ये व्हिडिओ शुटिंग आणि फोटोग्राफी कशी करावी व नंतर त्याचे एडिटिंग कसे करावे या संदर्भात कॅनॉनचे अधिकृत ट्रेनर सचिन कांबळे यांनी या कार्यशाळेत साध्या सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. कॅनॉन कॅमेरा कपंनीचे मॅनेजर किशोर चिंदरकर, रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडीओग्राफर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, उपाध्यक्ष राकेश दर्पे, सचिव विकास पाटील, खजिनदार विवेक पाटील, सल्लागार सुरेश खडपे, सचिन म्हात्रे, सचिन असराणी, वैभव वाणी, विजय पाटील, संतोष पाटील, सचिन शिंगरुत, गणेश जाधव, निशिल सासवनेकर, दिपेश पाटील, गणेश पाटील, कुणाल थळे, महेश मुसळे उपस्थित होते. छायाचित्रकारांसाठी जिल्हास्तरीय छायाचित्र स्पर्धेचे आयोजनदेखील या वेळी करण्यात आले होते.

स्पर्धेत अलिबाग येथील अमर मढवी प्रथम, पेण येथील सुरज करंगुले द्वितीय, सुदेश माळी तृतीय तर सचिन आसराणी याने उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले. कॅनॉन कॅमेरा केपनीचे मॅनेजर किशोर चिंदरकर, कॅनॉनचे अधिकृत ट्रेनर सचिन कांबळे आणि छायाचित्रकार संदीप वाटवे यांनी या छायाचित्र स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेत रायगड जिल्ह्यातून २३ छायाचित्रकारांनी सहभाग घेतला होता.

# नेणवली शाळेची गोमाशी लेणी क्षेत्रभेट



**पाली : प्रतिनिधी**

आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत राजिप शाळा नेणवलीची क्षेत्रभेट गोमाशी लेणी येथे नुकतेच झाली.

गोमाशीपासूनजवळच तोरंकेवाडी जाणाऱ्या रस्त्यालगत डोंगर व निसर्गरम्य अशा ठिकाणी ही गोमाशी लेणी वसली आहे. थोडे पुढे गेल्यावर मुलांना काही अंतरावर पायऱ्या दिसल्या. थोडे चढ गेल्यावर दगडाच्या कपारीत ही लेणी पाहून त्यात आतमध्ये पद्मासनात बसलेली बुद्ध मूर्ती ध्यान करताना पाहून विद्यार्थीसुद्धा आतमध्ये ध्यान करीत बसले.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अंतर्गत हे संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले असून १९५८ रोजी हे राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर केले आहे. गोमाशी लेणी हे आपल्या सांस्कृतिक वारसाचे एक अमूल्य दागिने आहेत. या लेणींचे वास्तूशिल्प आणि त्या काळातील जीवनशैलीची झलक विद्यार्थ्यांना पाहण्यास मिळाली. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक स्थळांबद्दल कुतूहल निर्माण झाले आणि त्यांच्यात देशप्रेम भावनाही रुजवण्यास मदत झाली. बाजूला डोगरवरून पडणारा पाण्याचा धबधबा लक्ष वेधून घेत होता.

मुलांनी येथे निसर्ग, प्राणी, पक्षी, फुले निरीक्षण,डोंगर, नदी, बंधारा याची माहिती घेतली. बाजूलाच असणाऱ्या गौमित फार्महाऊसला भेट देऊन निसर्गाचा मनमुराद आनंद लुटला. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोहर कोंडे व शिक्षणतज्ज्ञ महेंद्र पडवळ व पालक सदस्यांनी विशेष सहकार्य केले. क्षेत्रभेट नियोजन मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके, विषयशिक्षक रवींद्र हंबीर, उपशिक्षक गणपत वरगडे व नवनियुक्त शिक्षक शंकर जाधव यांनी केले.

# न्यू व्हिजन कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

न्यू व्हिजन कॉलेजमध्ये मुख्याध्यपक व विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून स्वातंत्र्य दिनानिमित्त अनेक उपक्रम राबविण्यात आले. झेंडावंदन झाल्यावर शालेय विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवरांसाठी कॉलेजच्या आवारात खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. कॉलेजचे संस्थापक राजू पिचिका, संचालक रशादशेठ मुजावर, युवा नेते ललित पाटील, तसेच पत्रकार बंधूनी या पदार्थांचा आस्वाद घेतला. विद्यार्थ्यांनी विविध पदार्थ घरगुती पद्धतीने बनवून आणले होते. या वेळी कॉलेजच्या अध्यक्ष नीता रामधरणे, संचालिका प्रतीक्षा कदम, मुख्याध्यापिका विद्या शिरसाट, कार्यालय अधीक्षक शेखर देशकर उपस्थित होते.



सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व **श्री. नित्यानंद सुंदर ठाकूर, राहणार – गव्हाण कोपर, ता. पनवेल, जि. रायगड** ------- (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. निर्वी लाईफस्फेसेस एल.एल.पी तर्फे भागीदार १) जयंतीलाल अर्जनभाई चोपडा २) कुणाल जयंतीलाल चोपडा यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्रासाठी मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ठ भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| १९२१ | २९.०७.२०२४ | पुष्पक नोड | २७ | ७९ | ३७० चौ.मी. पैकी १८५ | १३.०६.२०२४ | २०.०७.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसाच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''**ना हरकत प्रमाणपत्र**'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१७७/२०२४-२५

## निवडक

### बेकायदा तंबाखू विक्रीप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** बेकायदेशीररित्या राज्यात प्रतिंधीत असलेला व खाण्याचा अपायकारक असलेला पानमसाला व सुगंधीत तंबाखू असा अन्न पदार्थांचा साठा विक्री करण्यासाठी स्वतःच्या ताब्यात ठेवल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील आष्टे लॉजिस्टीकपासून कोन–सावळा रोडवरील एका पान टपरीवर अशा प्रकारे बेकायदेशीररित्या विमल पानमसाला, सुगंधीत तंबाखू व या गुन्ह्यासाठी वापरण्यात येणारी ॲक्टीव्हा स्कुटी असा मिळून जवळपास ३२ हजार ७७ रुपये किंमतीचा मुद्देमाल तालुका पोलिसांनी हस्तगत केला आहे.

### वास्तव कवितासंग्रहाचे प्रकाशन



**पनवेल :** येथील के.गो.लिमये विद्यालयात रायगडचे सुप्रसिद्ध कवी के.पी.पाटील यांच्या वास्तव या कवितासंग्रहाचे प्रकाशन स्वातंत्र्यदिनी रोहिदास पोटे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि वक्ते उरणचे सुपुत्र साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील होते. या कार्यक्रमाला पोलीस अधिकारी बी.आर. पाटील, मिलिंद जोशी, प्राचार्य बी.एस.माळी यांनी वास्तव चे भरभरून कौतुक केले. या वेळी सुप्रसिद्ध चित्रकार प्रकाश पाटील, राजेंद्र पालवे, आर.के.म्हात्रे यांची उल्लेखनीय उपस्थिती होती. पाटील मॅडम यांनी आभार मानले.

### मोहोपाडा परिसरात स्वातंत्र्य दिन

**मोहोपाडा :** रसायनी मोहोपाडा परिसरात भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राजिप मोहोपाडा शाळा, वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत, वासांबे तळाठी सजा कार्यालय आदी परिसरात ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. सकाळी ७:३० वाजता राजिप शाळा मोहोपाडा येथे ध्वजारोहण झाल्यानंतर मोहोपाडा तलाव येथे ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राजिप शाळेतील विद्यार्थ्यांनी वाजतगाजत मोहोपाडा गावातून वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत अशी पदरॅली काढली. या वेळी सरपंच उमा संदिप मुंढे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, राजिप मोहोपाडा शालेय शिक्षिका व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# जेएनपीए उभारणार प्रदूषण कमी करणारा प्रकल्प

## १०० कोटी खर्चाचा पायलट प्रोजेक्ट

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



जेएनपीए बंदरात उभ्या असलेल्या जहाजांना सौरउर्जा देण्यासाठी व पेट्रोल, डिझेलचा वाढता वापर दूर करण्यासाठी बंदर प्राधिकरणाने बंदरावरील किनारपट्टीवर विद्युत पुरवठ्यासाठी सौरऊर्जेवर चालणारा पायलट प्रकल्प राबविण्याची तयारी सुरू केली आहे. देशातील बंदरातील हा पहिलाच पायलट प्रकल्प ठरणार असून हा प्रकल्प उभारण्यासाठी जेएनपीए सुमारे १०० कोटींची गुंतवणूक करणार आहे.

या पायलट प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर इंधनाची बचत, वायु प्रदूषण कमी करण्यात मोठी मदत होणार आहे. तुर्तास एपीएम टर्मिनल्स आणि कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांच्यातील हा संयुक्त उपक्रम असल्याची माहिती जेएनपीए अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी दिली आहे.

जेएनपीए बंदरात अद्यावत अशी सहा खासगी बंदरे आहेत. या सहा बंदरात १२ ते १५ हजार कंटेनर वाहतूक क्षमतेची एकाचवेळी ३० मालवाहू जहाजे लागण्याची क्षमता आहे. कंटेनर मालाची चढउतार करण्यासाठी बंदरात तासनतास ही जहाजे बर्थवर उभी ठेवली जातात. या दरम्यान बर्थवर असताना जहाजातील हॉटेलिंग, अनलोडिंग आणि लोडिंग यासारख्या अत्यावश्यक सेवा चालवण्यासाठी जहाजे काही बेस लोड विजेचा वापर करतात.या विविध कामांसाठी विजेची आवश्यकता असते. यासाठी आवश्यक वीजपुरवठा करण्यासाठी जहाजाच्या क्षमतेनुसार १००० ते २५००० केव्हीए इतक्या प्रचंड क्षमतेच्या एचटी, एलटी दोन–तीन विद्युत जनित्रांचा वापर केला जातो.

मालाची चढउतार करण्यासाठी २४ ते ४८ किंवा कधीकधी त्याहूनही अधिक तास लागतात. या दरम्यानच्या काळात विद्युत जनित्रांना सहा ते नऊ टन लिटर्स डिझेल (६००० ते ९००० हजार लिटर्स) लागते. या दोन दिवसांसाठी पावणे सहा ते पावणे नऊ लाख रुपये खर्ची पडतात. जनित्रांवर मोठ्या प्रमाणावर इंधनाचा वापर होतो. यामुळे जनित्रातुन निघणाऱ्या धुरामुळे हवेतही प्रदुषण वाढते. वीजेसाठी इंधनावरही मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. इंधनावर होणारा वारेमाप खर्च आणि वाढत्या वायु प्रदुषणाची सर्वांनाच चिंता भेडसावू लागली आहे. यावर उपाययोजना म्हणूनच बंदरातील किनारपट्टीवरील जहाजांसाठी पायलट योजना राबविण्याचा पर्याय पुढे आला आहे. या प्रकल्पावर खर्च अधिक होत असल्याने जगभरात पायलट योजना फारशी प्रचलित झालेली नाही, अशी माहिती जेएनपीएचे एम ॲण्ड ईई विभागाचे मुख्य व्यवस्थापक नितीन बोरवणकर यांनी दिली.

विजेची गरज असते ती सर्व बर्थवरील जहाजाच्या डिझेल इंजिनमधून निर्माण केली जाते. जेएनपीए बंदरात बर्थवर उभ्या असलेल्या जहाजांना किनाऱ्यावरील विद्युत उर्जा पुरवण्यासाठी पायलट प्रकल्प राबविण्याची तयारी सुरू केली आहे.१०० कोटी खर्चाचा हा प्रकल्प प्रथम प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. देशात कार्यान्वित होणारा हा पहिलाच प्रकल्प आहे. साधारणता दिड वर्षात हा पायलट प्रकल्प कार्यान्वित होईल, अशी अपेक्षा आहे.



**बंदरांवरील जहाजावरील विद्युत पुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जनित्रांसाठी होणारा डिझेलचा वापर आणि वायू प्रदूषण कमी करण्यासाठी पायलट प्रकल्प मदतगार ठरणार आहे. बंदरातील सर्वच टर्मिनल्सवर ही सुविधा वाढवली तर राष्ट्रीय ग्रीडपासून बंदरात येणाऱ्या सर्वच जहाजांना किनाऱ्यावरील वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे. यासाठी एकूण ७४ मेगावॅट वीज आवश्यक आहे. यासाठी ६०० कोटी खर्चही अपेक्षित आहे.**
**–उन्मेष वाघ,**
**अध्यक्ष, जेएनपीए**



**पनवेल : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ २ (पनवेल) उपायुक्तपदी प्रशांत मोहिते यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या वेळी शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, भाजपचे उमेश इनामदार उपस्थित होते. ठाकरे यांचेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वागत केले.**

## अश्लील चित्रणप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

अंघोळ करणाऱ्या एका महिलेचे बिल्डींगच्या डकच्या पॅसेजमधून वर चढून बाथरुमच्या खिडकीमधून स्वतःच्या मोबाईलमधून विवस्त्र अवस्थेतील व्हिडीओ चित्रीत करणाऱ्या विरुद्ध पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोंडले गाव येथील एकदंत संकुल को.ऑपरेटीव्ह सोसायटीमध्ये एका २० वर्षीय तरुणाने त्या सोसायटीमध्ये राहणाऱ्या एका महिलेचा बाथरुममध्ये आंघोळ करताना बिल्डींगच्या डकच्या पॅसेजमधून वर चढून बाथरुमच्या खिडकीमधून स्वतःच्या मोबाईलमधून त्या महिलेच्या नकळत त्यांचा विवस्त्र अवस्थेतील व्हिडीओ चित्रीत केला. याबाबतची तक्रार त्या महिलेने तालुका पोलीस ठाण्यात केली असता तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मॉडर्न स्कूलमध्ये स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचा शपथ विधी सोहळा शिस्तबद्ध स्वरूपात झाला. धैर्य, स्वावलंबन, निरीक्षण क्षमता, सेवाभावी वृत्ती, जबाबदारीची जाणीव या जीवनाभिमुख मूल्यांची रुजवणूक करून उत्तम नागरिक घडविणे हे ध्येय उराशी बाळगून १९०७ साली लॉर्ड बेडन पॉवेल यांनी स्काऊट गाईड चळवळीची स्थापना केली.

प्रत्येक शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या चळवळीचे महत्त्व पटवून दिले जाते. त्याचाच एक भाग म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील विद्यालयात स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचा शपथ ग्रहण विधी सोहळा झाला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्काऊट व गाईडना स्कार्फ तसेच टोपी प्रदान करण्यात आली.

विद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास प्राचार्या सुमित्रा भोसले, पर्यवेक्षक आबासाहेब वाघ, स्काऊट व गाईडचे मार्गदर्शक शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



## बेकायदा लेबर कँपवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स विभागात पालिका व सिडकोच्या मोकळ्या जागेत शनिवारी (दि. १७) सकाळी सीवूड्स रेल्वेस्थानक परिसरात सेक्टर २५ येथील पालिकेच्या मल:निसारण केंद्राजवळ भूखंडाभोवती हिरव्या जाळीचे कुंपण लावून बेकायदा झोपड्या उभारल्या जात होत्या, परंतु पालिकेच्या बेलापूर विभाग सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल यांना बेकायदा कामाबाबत माहिती मिळताच तत्काळ तोडक कारवाई करण्यात आली आहे.

काही बांधकाम व्यावसायिकाकंडून मनमानी करण्यात येत आहे. सीवूड्स सेक्टर २५ येथे नवीन टॉवरचे काम सुरू असून याच ठिकाणी विकासकाकडून बेकायदा लेबर कॅम्प उभारण्यात येत असल्याने अतिक्रमण विभागाने या झोपड्यांवर कारवाई केली आहे.

## ‘एमएनएम’मध्ये शिवकालीन मर्दानी खेळाची प्रात्यक्षिके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पारंपरिक शिवकालीन मातीतल्या मर्दानी लाठी–काठी या खेळांची प्रात्यक्षिके आयोजित करून विद्यार्थ्यांना प्राचिन खेळांसाठी प्रेरित करण्यात आले.

उलवे नोड येथील वॉरियर्स क्लबचे संचालक आणि लाठी– काठी, दांडपट्टा, तलवारबाजी या मर्दानी खेळांचे प्रशिक्षक ओमकार रंधवे व सहाय्यक प्रशिक्षिका ऋतुजा रंधवे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रात्यक्षिके सादर केली. या वेळी ओमकार रंधवे यांनी पारंपरिक, प्राचिन तसेच शिवकालीन मर्दानी खेळांचे महत्त्व विषद केले. शारीरिक व्यायामाबरोबरच मानसिक स्वास्थ्य निर्माण करणाऱ्या खेळांचे जतन होण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले. सध्याच्या काळात स्वसुरक्षितता व बचाव आणि प्रतिकार करण्यासाठी या खेळांचा स्वसंरक्षणात्मक उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या वेळी रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी विद्यार्थ्यांचे आरोग्यदायी जीवन व स्मरणशक्ती साठी या पारंपरिक मर्दानी खेळांचा उपयोग करुन घ्यावा, असे आवाहन केले. प्रशिक्षणार्थी मधुरा चव्हाण, व्यंकोजी चव्हाण, प्रज्ञा चव्हाण, प्रांजल कजबजे, तनिष्क कजबजे, अभिमन्यू बेंद्रे, शरयु बेंद्रे, जयांशू पाटील यांनी लाठी काठीचे कर्तब सादर केले.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या प्रणिता गोळे, उपशिक्षक अविनाश कजबजे, मुंबईकर मॅडम, वाघमारे मॅडम, वर्षा नलावडे आदी शिक्षक तसेच पालक तानाजी चव्हाण आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## उरण केगावमध्ये रानभाजी महोत्सव

**उरण : वार्ताहर**



उरण तालुक्यातील केगांव येथील मानकेश्वर मंदिरात नुकतेच उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या नियोजित रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन उरणचे नायब तहसीलदार मंगेश पाटील, तसेच शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी प्रफुल्ल खारपाटील व कृषीभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी प्रकाश ठाकूर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. रानभाजी आठवडा हा ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधी दरम्यान राबविला जातो. दरम्यान, सहाय्यक कृषी अधिकारी आदीका पानसरे व बीटीएम नमिता वाकळे यांनी या रानभाजी महोत्सवाचे नेटके नियोजन केले होते.

रानभाज्यांचे गुणधर्म असे आहेत की, या भाज्यांमध्ये लोह, तंतुमय पदार्थ विपुल प्रमाणात आढळतात. या भाज्या आरोग्यासाठी उपयुक्त असतात. नैसर्गिक रान भाज्यांमध्ये खते कीटकनाशकांचा वापर होण्याचा प्रश्नच येत नसल्यामुळे त्या प्रदूषणमुक्तही असतात. नव तरुणांना या भाज्यांची माहिती व्हावी, काळानुरूप त्या नष्ट होऊ नये, यासाठी त्याचा प्रचार आणि प्रसार होणेही आवश्यक आहे. त्यासाठी अशा प्रकारचे रानभाज्यांचे महोत्सव किंवा प्रदर्शने ही भरली गेली पाहिजेत, असे उरणचे नायब तहसीलदार मंगेश पाटील यांनी सांगितले. महोत्सवात अनेक रानभाज्यांची मोठ्या प्रमाणावर विक्रीदेखील झाली आहे.

रानभाजी महोत्सवातील रानभाज्या कुर्डू, कंटोळी, शेवळी, कोरला, भारंगी, भोकर, रानकेळी, कुड्याची फुले, आंबट वेल, फोडशी, दिंडा, वाघेटी, टाकळा, आळंबी, भोपळा, अंबाडा, माठ, इकरा, कवळा आदी प्रकारची रानभाजी महोत्सवात ठेवण्यात आली होती.

**रानभाज्या या आदिवासी बांधवांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. रानभाज्यांचे खवय्यांनादेखील वेध लागलेले असतात. पावसाळी हंगामात मिळणाऱ्या दुर्मिळ रानभाज्या या स्वस्त मिळत असल्याने, या रानभाज्यांना ग्राहकांची मोठी मागणी असते.**
**–प्रकाश ठाकूर, कृषीभूषण शेतकरी**

**रानभाज्या या कोणतीही खते आणि कीटकनाशकांच्या वापराशिवाय मिळत असल्याने, या भाज्या पौष्टिक आणि औषधी असतात.**
**–प्रफुल्ल खारपाटील,**
**कृषीनिष्ठ शेतकरी**

## केबीपी कॉलेजचा रोहन तांबडे उत्कृष्ट स्वयंसेवक

**नवी मुंबई :** रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक रोहन रामकिसन तांबडे यांचा नुकताच मुंबई विद्यापीठाकडून उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून गौरव करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये ठाणे जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या कार्यक्षमतेवर आधारित या सन्मानाचा मानकरी म्हणून रोहनची निवड झाली आहे.

रोहन तांबडे हे केवळ एक जबाबदार स्वयंसेवक नाहीत, तर ते त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि समाजकार्याच्या अनन्य साधारण तळमळीमुळे सर्वांमध्ये आदर्श ठरले आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांनी राष्ट्रीय एकात्मता शिबिर, नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम, आणि सात दिवसीय रहिवासी शिबिरात महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत, मुंबई विद्यापीठाने त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान केले आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या, डॉ. शुभदा नायक, यांनी रोहनच्या या उल्लेखनीय यशाचे अभिनंदन केले आणि त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशस्वी प्रवासामध्ये रोहनला एनएसएस प्रकल्प अधिकारी डॉ. लक्ष्मण गवळी, डॉ. प्रणिता भाले आणि प्रा. अमित सुर्वे यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले आहे.



रामप्रहर श्रावणधारा

### वेडा श्रावण

**हिरवे हिरवे क्षण मोहाचे श्रावणातले**
**वय विसरावे, फुलून येते सर्व आतले**

**वनराईचे तरूण होणे किती भावते**
**काठ नदी हा तुडूंब जणु की, प्रिया धावते**
**आभाळाने वरून सारे भाव ओतले**
**वय विसरावे, फुलून येते सर्व आतले**

**चिंब मनाच्या चिंब भावना निसरड्या किती**
**संयम सुटतो, ह्रदयाची मग वाढून गती**
**अंगावरती सांडत बसतो ढग मनातले**
**वय विसरावे, फुलून येते सर्व आतले**

**थेंब टपोरे केसांमधुनी ओघळताना**
**मयूरसुध्दा रानामध्ये देतो ताना**
**उष्ण वाटते गीत कसे हे पावसातले**
**वय विसरावे, फुलून येते सर्व आतले**



**–यशवंत पगारे,**
**बदलापूर**

# विधानसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागा -आमदार रविशेठ पाटील

## ◆ नागोठण्यात भाजप जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**

जनसामान्यांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी भाजप जनसंपर्क कार्यालयाचा उपयोग करा. आता ग्रामपंचायतीपासून ते विधानसभेपर्यंत निवडणूक येत आहेत. त्यामुळे या निवडणूक काळात कार्यकर्त्यांना एकत्र आणण्याची जबाबदारी मोठी आहे आणि ही जबाबदारी पार पाडण्यासाठी कार्यालयाचा उपयोग होणार आहे. बूथ कमिटी स्थापना करून त्या कमिटीचा आढावा घ्या. नागोठण्यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला चांगल्या प्रकारे मताधिक्क्य मिळाले होते. आता विधानसभा निवडणुकीत लोकसभेपेक्षा अधिक मताधिक्क्य मिळविण्यासाठी जोमाने कामाला लागा, असे आवाहन पेण सुधागड मतदार संघांचे आमदार रविशेठ पाटील यांनी भाजप कार्यकर्त्यांना केले.





नागोठणे गांधी चौकात भाजपच्या नूतन जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते शनिवारी (दि.१७) सायंकाळी पार पडले. तत्पूर्वी आमदार रविशेठ पाटील यांनी भाजप कार्यालयासमोरील राष्ट्रध्वज फडकविल्यानंतर कार्यकर्त्यांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.

या वेळी माजी आमदार दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मारुती देवरे, रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, तालुका सरचिटणीस आनंद लाड, शहराध्यक्ष सचिन मोदी, सिराज पानसरे, संतोष लाड, विवेक रावकर, रोहा डॉक्टर सेल अध्यक्ष डॉ.रोहिदास शेळके, शेखर गोळे, राउफ कडवेकर, निमिष वाघमारे, अशोक अहिरे, धनराज उमाळे, तिरत पोलसानी, अ‍ॅड. गणेश जाधव, गणेश घाग, प्रमोद नागोठणेकर, सुदेश येरुणकर, मारुती शिर्के, नामदेव मढवी, राजन दुबे, जावेद दापोलकर, सुनिता लाड, शीतल नांगरे, सोनी पांडे, सोनाली पडवळे आदींसह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान लाडकी बहीण योजना, वयश्री योजना व इतर शासकीय योजनेचा सर्वसामान्य जनतेला लाभ मिळवून देण्यासाठी तसेच जनतेच्या इतर शासकीय कामांसाठी भाजपच्या जनसंपर्क कार्यालयाचा उपयोग आम्ही करीत असल्याचे या वेळी तालुका सरचिटणीस आनंद लाड यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश घाग यांनी केले, तर आभार सरचिटणीस आनंद लाड यांनी मानले.

## लाडक्या बहिणींची बँकेत गर्दी

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता बँकेत जमा झाल्याचे समजताच बहिणींनी बँकेत तुफान गर्दी झाली. त्यामुळे दैनंदिन व्यवहार करणारे यांच्या कामात व्यत्यय येत होता.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू झाल्यापासून महिला बँकेत खाते उघडणे, आधार कार्ड नोंदणी करणे, आधार कार्ड लिंक करणे, आपला अर्ज मंजूर झाला का याची तपासणी करणे यासाठी सतत बँकेत, आधार कार्ड केंद्रावर जाणे,सायबर कॅफे जाऊन तपासणी करणे अशी माहिती घेत होती. ज्यांचे अद्याप झाले नाही ते धावपळ करताना दिसत आहेत.

गेले दोन दिवस मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता बँकेत जमा झाल्याचे समजताच बहिणींनी बँकेत तुफान गर्दी केल्याचे दिसत आहे. चौक येथील बँक ऑफ इंडियाच्या आणि बँक ऑफ बडोदा येथे महिलांची तुफान गर्दी बघण्यास मिळाली.



## वाक्रुळ येथे पोलीस चौकीचे उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाण्याच्या अंतर्गत पेण पूर्व विभागातील वाक्रुळ येथे दुरक्षेत्र वरसई–वाक्रुळ पोलीस चौकीचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांच्या हस्ते व माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



पूर्व विभागाची पोलीस चौकी वरसई गावात असल्याने अनेक गाव व वाड्यातील नागरिकांना एखादी तक्रार किंवा समस्येबाबत वरसई गावात जावे लागत होते. पेणचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी वरसई चौकीची पाहणी केली असता ही चौकी एका बाजूला असल्याची बाब लक्षात येताच वाक्रुळ हेटवणे कॉलनी हे ठिकाण मध्यवर्ती असल्याने सर्वांना सोयीस्कर पडेल त्यामुळे पोलीस चौकी वाक्रुळ येथे करण्यात आली. चौकी झाल्याने पूर्व विभागातील गावे व वाड्यातील नागरिकांनी पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांचे आभार व्यक्त केले.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, भाजप जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार धैर्यशील पाटील, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सागरी पोलीस निरीक्षक नागेश कदम, पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे, मावळा प्रतिष्ठान अध्यक्ष मंगेश दळवी, उद्योजक राजू पिचिका, वाक्रुळ सरपंच गणेश गायकर, कामार्ली सरपंच गजानन मोरे, वाक्रुळ पोलीस पाटील केशव पाटील, आदी पोलीस कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## निवडक

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**महाड** : तालुक्यातील मित्रत्व सामाजिक संस्थेच्या वतीने तेटघर आणि शिरवली या शाळांमध्ये साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच या प्रसंगी वृक्षारोपणही करण्यात आले. या वेळी अध्यक्ष चंद्रजित पालांडे, उपाध्यक्ष राजेंद्र महाडीक, सचिव यासीन पेडेकर, खजिनदार शाम खोपकर, सदस्य सचिन सोनावणे, किशोर भोसले, प्रदिप कावलगुडे, सुरेश जाधव, सचिन वडके, चंद्रकांत पाचाडकर, साहील पालांडे, युसुफ पोसीलकर तेटघर शाळेचे मुख्याध्यापक सचिन खोपडे, शिरवली मुख्याधिपीका अहिरे मॅडम, शिरवली गावचे सरपंच गणेश पवार, उपसरपंच अशोक माने आदी उपस्थित होते.

### हिरवळ महाविद्यालयाचा क्षेत्रभेट उपक्रम



**माणगाव** : हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (सीएसआयटी)मधील आयटी व सीएस विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी श्री समर्थ ब्रॉडबँड आणि साईराजदीप केबल नेटवर्कला क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. धनंजय पोतदार यांनी नेटवर्किंग संकल्पनांवर माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगताना नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चरची, ब्रॉडबँड सेवांचे कार्य आणि सुरक्षित आणि कार्यक्षम नेटवर्क व्यवस्थापनाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. यानंतर साईराजदीप केबल नेटवर्कला भेट दिली. प्रदिप शेठ यांनी व्यावहारिक प्रात्यक्षिके करून दाखविली. नेटवर्किंग तत्त्वांचा वास्तविक–जगातील वापर कसा केला जातो यावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना केबल नेटवर्किंगच्या स्थापनेपासून समस्या निवारणापर्यंतच्या विविध घटकांवर मार्गदर्शन केले.

### दुर्गा बचत गटाचा सन्मान

**कर्जत** : तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायतीमध्ये मुंबई येथील युनायटेड वे या संस्थेकडून समग्र ग्रामविकास कार्यक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमात गेली दोन वर्षे नागेवाडी या आदिवासीवाडीमधील श्री दुर्गा महिला बचत गट अग्रक्रमावर राहून कार्य करीत आहे. कार्यक्रमात राजिप प्राथमिक शाळा, नागेवाडी येथील मुख्याध्यापक राजेश गंजेवार आणि शिक्षक विनोद पाटील यांच्या अधिपत्याखाली ४० विद्यार्थ्यांनी नागेवाडी गावात प्रभात फेरी काढली. युनायटेड वे मुंबई संस्थेचे प्रतिनिधी विवेक कोळी यांनी जलसंजीवनी प्रकल्प आणि समग्र ग्राम विकास कार्यक्रम अंतर्गत राबविलेल्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली.

## साजगाव फाटा–महड रस्त्याची दुरवस्था



**खोपोली : प्रतिनिधी**

अष्टविनायक क्षेत्रापैकी असलेले महड येथील वरदविनायक गणपती मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे भक्तांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. याच ठिकाणी धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या पाताळगंगा नदीच्या किनाऱ्यावर दशक्रिया होत असते, मात्र येथील खड्डेमय रस्त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

महड हे अष्टविनायक गणपती म्हणून प्रचलित असून याच दैवस्थानांच्या ठिकाणी जाणाऱ्या रस्त्याची दूरवस्था झाल्यामुळे येथून प्रवास करणारे भक्तगण नारजी व्यक्त करीत आहेत. हा मार्ग जवळचा असल्यामुळे कामगार, शाळकरी मुले याच मार्गाचा अवलंब केला जात आहे. परिणामी रस्त्यावर निर्माण झालेले हे खड्डे अनेकांना शारीरिक व्याधी देत आहे. त्यामुळे प्रशासनाने लवकरात लवकर या रस्त्याची दुरूस्ती करावी अशी मागणी होत आहे.

## पश्चिम बंगालमधील घटनेच्या निषेधार्थ मुरूडमध्ये डॉक्टरांचे निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

पश्चिम बंगालमधील महिला डॉक्टरवर झालेल्या सामुहिक बलात्कार आणि अमानुष खून प्रकरणाच्या निषेधार्थ जंजिरा मेडिकल असोसिएशनच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला. या संदर्भातील निवेदन तहसीलदार, पोलीस निरीक्षक व वैद्यकीय अधीक्षकांना देण्यात आले.

या वेळी जंजिरा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ. संजय पाटील, सचिव डॉ.वसीम पेशईमाम, खजिनदार डॉ. अमित बेकर, डॉ. राज कल्याणी, डॉ. मयुर कल्याणी, स्त्रीरोग तज्ज्ञ व प्रस्तुती तज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील, डॉ. भाविका कल्याणी, डॉ. रवींद्र नामजोशी, डॉ.मकबुल कोकाटे डॉ. निसार बिरावडकर, डॉ. हितेश जैन, मनिष प्रधान, डॉ.सदफ पेशईमाम, डॉ. शकील परदेशी, डॉ. श्रीया पाटील, डॉ. स्नेहा दिवेकर, डॉ. स्वप्नील दिवेकर, अंजली पाटील, सुनील पटेल, डॉक्टर खान आदी उपस्थित होते.

निवेदनात असे म्हटले आहे की, आरजी कर मेडिकल कॉलेज कोलकाता येथे ३१ वर्षीय ट्रेनिंग महिला डॉक्टरवर झालेल्या अमानुष अत्याचार व दुर्दैवी मृत्यूचा जंजिरा मेडिकल असोसिएशनच्या वतीने निषेध करतो. डॉक्टरांवर वारंवार होणाऱ्या हल्लांबाबत संघटनेने अनेक स्तरांवर आपले मत परखडपणे मांडले आहे. त्यामुळे आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे.



## वृक्षसंवर्धन केलेल्या झाडांना बांधली राखी




**चौक : प्रतिनिधी**

राजिप शाळा वडवळ येथे रक्षाबंधनानिमित्त लावलेल्या झाडांना राखी बांधून अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

वडवळ शाळेत नेहमी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. लावलेल्या झाडांचे संवर्धन व जतन केल्याने ही झाडे वाढली आहेत, झाडांची लागवड, जोपासना, संवर्धन विद्यार्थी आणि शिक्षक यांनी केले आहे. रक्षाबंधनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थिनींनी झाडांना राखी बांधून एक अनोखा उपक्रम राबविला. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. या वेळी वृक्षसंवर्धनाची प्रतिज्ञा देण्यात आली. या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक सुधाकर रामकृष्ण थळे यांनी केले होते. राजाराम जाधव, करूणा बोंबे, हर्षा काळे उपस्थित होते.

## खोपोलीतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**खोपोली : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत खोपोली शहरातील विविध कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.१७) शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेशकर्त्या कार्यकर्त्यांचे आमदार थोरवे यांनी स्वागत केले.

उद्धव ठाकरे गटाचे युवा नेते अनिल सानप यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. कर्जत–खालापूर मतदारसंघात एवढ्या मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली. या कार्यप्रणालीवर आपण विश्वास ठेवत शिवसेनेत प्रवेश करीत असल्याचे सानप यांनी या वेळी सांगितले.



आमदार महेंद्र थोरवे यांनी सरकारच्या माध्यमातून या मतदारसंघाच्या विकासाचा आपण ध्यास घेतला असून, विरोधकांनी कितीही टीका केली तरी विकासकामांच्या माध्यमातून आपण त्यांना उत्तर देणार असल्याचे सांगितले. एवढ्या मोठ्या प्रमाणात राज्य सरकारने या मतदारसंघासाठी निधी दिल्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरली असल्याचेही त्यांनी सांगितले.

शहराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मोहन अवसरमल, संदीप पाटील यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण रिठे यांनी केले. कार्यक्रमाला कर्जत खालापूर संघटक पंकज पाटील, महिला आघाडीच्या प्रिया जाधव, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, सहकार सेनेचे हरीश काळे, प्रसाद वाडकर, माजी नगरसेविका माधवी रिटे, जिनी सॅम्युअल, मेधा वाडकर, दिनेश थोरवे, अनिल मिंदे, सोनू शेलार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माथेरानचे जागृत ग्रामदैवत श्री पिसारनाथ मंदिर



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान हे जरी पर्यटनस्थळ असले, तरी येथे ऐतिहासिक वास्तू आजही दिमाखात उभ्या आहेत. त्यातील एक ऐतिहासिक वास्तू म्हणजे स्वयंभू जागृत देवस्थान श्री पिसारनाथ मंदिर होय. मंदिराच्या भोवताली घनदाट जंगल, प्रवेशद्वारासमोरील भव्य असा शारलोट तलाव, नयनरम्य वातावरण यामुळे येथील मंदिर आपली वेगळीच छाप सोडत आहे.

१८५०मध्ये माथेरानचा शोध मॅलेट या इंग्रज गव्हर्नर अधिकारी यांनी लावला. त्या वेळी वाट दाखविण्यासाठी त्यांच्याबरोबर एक धनगर आला होता. हा समाज येथे माथेरानच्या पायथ्याशी वसला होता. त्यांच्या गाई चरणासाठी माथेरानच्या डोंगरावर गवळी आणत असे. त्यातील एक गाय गवळ्याची नजर चुकवून शारलोट तलावाच्या बाजूच्या जंगलात जाऊन एक झाडाच्या मुळाशी आपला पान्हा दररोज सोडत असे. त्यामुळे या गाईकडून त्याला दुधाचे प्रमाण कमी मिळू लागल्याने त्यांनी गाईवर पाळत ठेवली. त्या वेळी त्यांना कळपातून गाय वेगळी होऊन झाडाजवळ जाऊन पान्हा देत आहे असे दिसले. हे पाहिल्यावर सर्व गावकऱ्यांनी मिळून तिथे खोदकाम केले असता त्यांना शिवलिंग दिसले. काही दिवसानंतर माथेरानच्या ग्रामस्थांनी याच ठिकाणी जागृत देवस्थान म्हणून शिवमंदिर बांधले.

आजही या मंदिरात धार्मिक कार्यक्रम होत असतात. श्रावण महिन्यात तर येथे अनेक भाविक मंदिराला भेट देत असतात, तसेच श्रावणातील पहिल्या सोमवारी येथे माथेरान क्षत्रिय मराठा समाजाच्या वतीने महाभिषेक सोहळा अनेक दशकांपासून आयोजित केला जातो.

**असे प्रचलित झाले पिसारनाथ नाव**

ज्येष्ठ नागरिकांच्या म्हणण्यानुसार माथेरान उदयास येण्याअगोदर शंकर भगवान पिसा नावाच्या झाडाच्या खोडामध्ये प्रकट झाले होते. त्यामुळे या मंदिराला पिसारनाथ मंदिर म्हटले जाते.

# गावातील मुलींनी कुस्तीत पुढे यावे

## विनेश फोगटचे आवाहन; काका महावीर यांची घेतली भेट

**चंदिगड : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतून पदकाशिवाय परतलेल्या कुस्तीपटू विनेश फोगटचे हरियाणातील बेलाली गावात जोरदार स्वागत करण्यात आले. या वेळी विनेशने काका महावीर फोगट यांची भेट घेत त्यांना मिठी मारली. दोघेही खूप भावूक दिसत होते. यादरम्यान विनेशने सांगितले की, ऑलिम्पिकमध्ये पदक न मिळाल्याने तिला खूप दुख झाले आहे. ही जखम बरी व्हायला वेळ लागेल. आपल्या गावातील मुलींनी कुस्तीत पुढे यावे, अशी माझी इच्छा आहे.



विनेश फोगट म्हणाली, हे ऑलिम्पिक पदक खोल जखम बनले आहे. ते भरायला वेळ लागेल, पण मला माझ्या देशातील जनतेचे आभार मानायचे आहेत. मी कुस्ती सोडली आहे की पुढे चालू ठेवणार हे मी आताच काही सांगू शकत नाही. आमचा लढा संपलेला नाही. मी नुकताच त्याचा एक भाग पार करून आली आहे. ही एक दीर्घ लढाई आहे.

विनेश आपल्या गावातील लोकांना संबोधित करताना म्हणाली, मला माहीत नाही मी इतके प्रेम आणि आदर मिळवण्यास पात्र आहे की नाही, परंतु मी स्वत:ला खूप भाग्यवान समजते अशा गावात, अशा लोकांत जन्माला आले. माझ्या गावाचा सन्मान करून त्याचे ऋण फेडण्यात मी भूमिका बजावू शकली याचा मला सार्थ अभिमान आहे. या गावासाठी आणि तुमच्या सन्मानासाठी लढण्यासाठी मी नेहमीच सर्वात पुढे असेन.

विनेश पुढे म्हणाली, आता मार्ग दाखवला आहे, आशा निर्माण केली आहेत. आता आमच्या बहिणींनी वारसा पुढे चालवत ठेवायचा आणि हे स्वप्न पूर्ण करायचे आहे. तुम्ही सर्वांनी, माझ्याप्रमाणे माझ्या बहिणींना साथ दिली पाहिजे. त्या खूप काही करू शकतात. आम्हाला तुमची साथ, तुमची आशा, तुमचा विश्वास हवा आहे.

# द. आफ्रिकेच्या विजयाने पाकिस्तान संघाला धक्का

## डब्ल्यूटीसी गुणतालिकेत झाला बदल

**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ४० धावांनी विजय नोंदवला. या सामन्यात वेस्ट इंडिज संघाची फलंदाजी ढेपाळलेली पहायला मिळाली, ज्यामुळे वेस्ट इंडिज संघाला सामन्यासह मालिकाही गमवावी लागली. दुसऱ्या कसोटी सामन्यात २६३ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना वेस्ट इंडिजचा संघ २२२ धावांवर गारद झाला. यासह आफ्रिकेने दोन सामन्यांची कसोटी मालिका १–०ने जिंकली. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्यातील कसोटी सामन्यानंतर जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत बदल झाला आहे.



वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत पाकिस्तानच्या वर पोहचला आहे. आफ्रिका सध्या डब्ल्यूटीसीच्या गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिकेने सहा सामने खेळले असून त्यापैकी दोन जिंकले आणि तीन गमावले आहेत. यामुळे त्यांची विजयाची टक्केवारी ३८.८९ आहे, तर पाकिस्तान संघ सहाव्या स्थानावर आहे. पाकिस्तानने आतापर्यंत पाच सामने खेळले आहेत, त्यापैकी दोन जिंकले आणि तीन हरले आहेत. पाकिस्तानच्या विजयाची टक्केवारी ३६.६६ आहे. पाकिस्तानला अजूनही घरच्या मैदानावर बांगलादेश आणि इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिका खेळायची आहे. या सामन्यात विजय मिळवून पाकिस्तानी संघ अव्वल स्थानावर पोहचू शकतो.

जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या २०२४–२५ पॉइंट टेबलमध्ये भारतीय संघ अव्वल स्थानावर आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलिया दुसऱ्या क्रमांकावर असून त्यांची विजयाची टक्केवारी ६२.५० आहे. यानंतर न्यूझीलंड तिसऱ्या, श्रीलंका चौथ्या आणि दक्षिण आफ्रिका पाचव्या स्थानावर आहे. न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्या विजयाची टक्केवारी ५०–५० आहे, तर दक्षिण आफ्रिकेची विजयाची टक्केवारी ३८.८९ आहे.

### भारतीय संघ अव्वल स्थानी कायम


जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत भारतीय संघ पहिल्या क्रमांकावर आहे. या संघाने आतापर्यंत एकूण नऊ सामने खेळले आहेत, त्यापैकी सहा जिंकले आणि दोन गमावले आहेत. संघाची विजयाची टक्केवारी ६८.५१ आहे. भारतीय संघाला अजूनही बांगलादेश, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर एकूण १९ कसोटी सामने खेळायचे आहेत, जे डब्ल्यूटीसी अंतिम फेरीत पोहचण्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत.

# पाकमधील स्लो इंटरनेटमुळे बांगलादेशच्या खेळाडूंना समस्या

**रावळपिंडी : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका २१ ऑगस्टपासून खेळली जाणार आहे. या मालिकेसाठी बांगलादेशचा संघ काही दिवसांपूर्वीच पाकिस्तानात पोहचला आहे. सध्या दोन्ही संघ सराव करत असून बांगलादेश संघाने पाकिस्तानमध्ये इंटरनेट स्पीड स्लो असल्याची तक्रार केली आहे.

मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा केला जात आहे की, पाकिस्तानमध्ये



इंटरनेट स्लो असल्यामुळे बांगलादेशचे खेळाडू त्यांच्या कुटुंबीयांशी नीट बोलू शकत नाहीत. त्यामुळे त्यांनी तक्रार केली आहे. पाकिस्तानी वृत्तवाहिनी जिओ न्यूजच्या एका पत्रकाराने दावा केला आहे की, बांगलादेश क्रिकेट संघाने आपल्या संघ व्यवस्थापनाकडे तक्रार केली ती पाकिस्तानमध्ये इंटरनेटचा वेग कमी आहे.

सध्या बांगलादेशातील परिस्थिती खराब आहे. पंतप्रधान शेख हसीना परागंदा झाल्यापासून देशात हिंसाचार उसळला आहे. म्हणूनच बांगलादेशच्या खेळाडूंना कुटुंबियांची काळजी वाटत आहे, पण पाकिस्तानमध्ये इंटरनेट स्पीड स्लो असल्याने त्यांना नीट व्हिडीओ कॉलही करता येत नाहीत.

## पॅट कमिन्सने घेतला ब्रेक

**सिडनी** : भारताविरुद्ध या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बॉर्डर गावसकर मालिकेसाठी ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने तयारीला सुरुवात केली आहे. कमिन्सने दोन महिन्यांसाठी क्रिकेटमधून ब्रेक घेतला आहे. आगामी काळात भारताविरुद्ध होत असलेल्या मोठ्या मालिकेच्या दृष्टीने त्याने हा निर्णय घेतला.

कमिन्सने सांगितले की, सततच्या क्रिकेटमुळे विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला आहे. मी मागील १८ महिन्यांपासून सातत्याने खेळत आलो आहे, सातत्याने गोलंदाजी केली. विश्रांतीनंतर मी गोलंदाजीपासून पूर्णपणे दूर राहीन. सात–आठ आठवडे विश्रांती घेतल्याने शरीरही चांगली साथ देईल.

# सिनसिनाटी टेनिस स्पर्धेत दिग्गजांना पराभवाचा धक्का

**सिनसिनाटी : वृत्तसंस्था**

चार ग्रँडस्लॅम विजेतेपद मिळवणाऱ्या स्पेनच्या दुसऱ्या मानांकित कार्लोस अल्कराझचा सिनसिनाटी खुल्या टेनिस स्पर्धेत फ्रान्सच्या गेल मोनफिल्सकडून पराभव झाला. यानंतर अल्कराझने आपला राग रॅकेटवर काढत त्याला खाली आदळून मोडून टाकले. महिला गटातही बड्या खेळाडूंना पराभवाचा धक्का बसला.

मोनफिल्सने तीन सेटपर्यंत चाललेल्या सामन्यात अल्कराझला ४–६, ७–६ (७–५), ६–४ असे पराभूत केले. सामन्यातील पहिला सेट जिंकत अल्कराझने चांगली सुरुवात केली होती, मात्र मोनफिल्सने सलग दोन सेट जिंकत सामन्यात विजय मिळवला. या विजयानंतरही मोनफिल्स पुढे चमक दाखवता आली नाही. यानंतरच्या सामन्यात होल्गर रुनने त्याला ३–६, ६–३, ६–४ असे नमवले.

महिला गटात जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असणाऱ्या इगा श्वीऑटेकने मार्ता कोस्त्युकला ६–२, ६–२ असे सरळ सेटमध्ये नमवत उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले. अरिना सबालेन्काने एलिना स्वितोलिनावर ७–५, ६–२ असा विजय मिळवला, तर मीरा अँड्रिवाने फ्रेंच खुली टेनिस व विम्बल्डन स्पर्धेत उपविजेती ठरलेल्या जॅस्मीन पाओलिनीला ३–६, ६–३, ६–२ असे नमवले. अन्य सामन्यात अनास्तासिया पाव्लुचेनकोवाने ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती झेंग किनवेनला ७–५, ६–१ अशा फरकाने पराभूत केले.

# द हंड्रेड स्पर्धेत टाकली गेली पाच चेंडूंची 'सुपर ओव्हर'

**लंडन : वृत्तसंस्था**

टी–२० आणि वनडे क्रिकेटमध्ये सामना टाय झाल्यानंतर सुपर ओव्हरद्वारे सामन्याचा निकाल लागतो. अशा वेळी दोन्ही संघांना सुपर ओव्हरमध्ये प्रत्येकी चेंडू खेळण्याची संधी मिळते आणि या कालावधीत जो संघ जास्त धावा करतो तो विजेता ठरतो, पण कधी सुपर ओव्हरमध्ये ५–५ चेंडूंचा खेळ पाहिला आहे का? कदाचित नाही, पण इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या द हंड्रेड स्पर्धेत हे दिसून आले आहे. स्पर्धेच्या नावाप्रमाणेच त्याचे नियमही अनोखे आहेत.



द हंड्रेड स्पर्धेचे सामने १००–१०० चेंडूंचे आहेत आणि या स्पर्धेतील सुपर ओव्हरचा नियम जगाला समजला, कारण साउदर्न ब्रेव्ह आणि बर्मिंगहॅम फिनिक्स यांच्यातील एलि एलिमिनेटर सामना टाय झाला. यानंतर सामन्याचा निकाल लावण्यासाठी दोन्ही संघांमध्ये सुपर–५ सामना झाला, ज्यामध्ये दोन्ही संघांना प्रत्येकी पाच चेंडू खेळण्याची संधी मिळाली. कारण या स्पर्धेतील षटकात केवळ पाच चेंडू टाकले जातात.

या वेळी प्रथम फलंदाजी करताना बर्मिंगहॅम फिनिक्स संघ जोफ्रा आर्चरच्या वेगवान गोलंदाजीसमोर झुंजताना दिसला आणि केवळ सात धावा करू शकला. या धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या सदर्न ब्रेव्हने चार चेंडूत दोन चौकार मारून सामना जिंकला आणि स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला.

सामन्याबद्दल बोलायचे झाले तर नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत दक्षिण ब्रेव्हने बर्मिंगहॅम फिनिक्ससमोर विजयासाठी १२७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. कर्णधार जेम्स विन्सने सदर्न ब्रेव्हकडून सर्वाधिक ४३ धावांची खेळी खेळली. सदर्न ब्रेव्हकडून मिळालेल्या १२७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बर्मिंगहॅम फिनिक्स संघालाही १०० चेंडूत केवळ १२६ धावा करता आल्या आणि सामना बरोबरीत सुटला. लियाम लिव्हिंगस्टोनने ३४ चेंडूत ५५ धावांची स्फोटक खेळी खेळली, पण तीन चेंडू पूर्वी तो बाद झाला आणि संघाला विजयाचा उंबरठा ओलांडत आला नाही. अखेर सुपर ओव्हरमध्ये सदर्न ब्रेव्हने बाजी मारली.

# लाडक्या बहिणींचा देवाभाऊ कार्यक्रमास पनवेलमध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com